# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | १० |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**


**गणपत्रिका क्रमांक : ८५**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष पाचवे / अंक १० / सप्टेंबर २००४



## *संपादकीय*

## ‘श्वास’ची आश्वासक बातमी

मातृप्रेमाचे महन्मंगल स्तोत्र असणाऱ्या ‘श्यामची आई’ चित्रपटास सुवर्णकमळ व बालअभिनेत्यास उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार मिळाल्यानंतर ‘श्वास’ ला ५० वर्षांनी हा पुरस्कार व सुवर्णकमळ मिळाले. मराठी चित्रपट निर्मिती दिग्दर्शन अजूनही तग धरून आहे याचे आश्वासन देणारी ही घटना !

श्वास अप्रतिमच आहे. कथासूत्रातील एखाद दुसरा कच्चा दुवा सोडला तर श्वासची निर्मिती, त्यातील वातवरण निर्मिती, दिग्दर्शन व सर्व काही अप्रतिमच आहे. अश्विन चितळे, अरूण नलावडे, अमृता सुभाष व डॉक्टरची व्यक्तिरेखा हुबेहुब साकारलेले संदीप कुलकर्णी या सर्वांचे विलक्षण बेअरिंग ... अवाक करणारे आहे. ‘श्वास’ या नावाबद्दल श्री. नलावडे यांनी एका मुलाखतीत ‘‘डोळ्यांच्या शस्त्रक्रिये पूर्वीचा व नंतरचा एक श्वास आजोबा नातवाला जगायला देतात... म्हणून ‘श्वास’’ असा खुलासा केला. डोळे असणाऱ्यांच्या व नसणाऱ्यांच्या दुनियेतील तो ‘परश्या’ कायम मनात घर करून रहातो. लहान मुलाकडून अभिनय करून घेणे म्हणजे दिग्दर्शकाची जी कसरत असेल त्याची केवळ कल्पना केलेली बरी ! आचार्य अत्रेंसारख्या उत्तुंग प्रतिभेच्या कलाकार होता म्हणून ‘श्यामची आई’ हे सानेगुरुजींनी रचलेले स्तोत्र अजरामर झाले. श्वास बाबत असाच मध्यामावर विलक्षण पकड असणारा दिग्दर्शक लाभला, संदीप सांवत यांच्या रूपाने व श्वासही अविस्मरणीय ठरला.

या पन्नास वर्षात अनेकांचे चांगले मराठी चित्रपट येऊन गेले. रात्र आरंभ, बनगरवाडी, आत्मविश्वास .... किती नाव घ्यायची ? पण ‘श्वास’ यायला ५० वर्षे थांबावे लागले. या चित्रपटाबद्दल एका वर्तमान पत्रात एका वाचकाने या चित्रपटाला ‘ऑस्कर ॲवॉर्ड’ मिळावा असे मत मांडले होते. ते त्याचे वैयक्तिक मत असले तरी ते मिळू नये असे कोणतेच कारण नाही ! असो.

श्वास पाहिल्यावर दिवसभर मन सुन्न होते. परश्या सारखा लहान मुलगा आपले डोळे गमवाताना ज्या ताकदीने प्रसंगाला सामोरे जातो ते ही खेड्यातील असून, ते पाहून मनाची घालमेल होत राहिली. अस्वस्थ करते, विचार करायला लावते ती कलाकृती उत्तम असते. श्वास ने वैद्यकीय व्यवसायापासून अनेक प्रश्नांचे तरंग मनात उमटवत ठेवले. सुवर्णकमळ मिळाल्यानंतर पुन्हा एकदा पहावा असं या चित्रपटाबद्दल पुन्हा पुन्हा वाटत आहे. श्वासचे यश त्यातच आहे !



# गीता संदेश

(डिसेंबर महिन्यात ४ तारखेला 'गीता जयंती' आहे. त्या निमित्ताने गीता संदेश देत आहोत. – संपादक)

✿ *कशाला व्यर्थ चिंता करीत आहेस? कुणाला घाबरतो आहेस? तुला कुणीही मारू शकत नाही. आत्मा अमर आहे.*

✿ *जे झाले आहे, जे होत आहे आणि जे होणार आहे ते सारे ईश्वरेच्छेने होत असल्याने ठीक आहे. गतकाळाचा पश्चाताप नको, भविष्याची चिंता नको. वर्तमानातच जग !*

✿ *तुझे काय गमावले म्हणून तू शोक करीत आहेस? तू काय घेऊन आला होतास? तू स्वतःचे असे काय निर्माण केलेस? जे मिळविलेस ते परमेश्वराकडूनच मिळविलेस. जे गमावलेस ते या भगवद्भूमीमधीलच होते. तू रिकाम्या हाताने आला आहेस व रिक्तहस्ते जात आहेस! तुजे असे काही नव्हते आणि असणारही नाही. तेव्हा या नश्वर गोष्टींना माझे समजून वृथा शोक करू नकोस !*

✿ *माया परिवर्तनशील आहे. संसार क्षणभंगुर आहे. एका क्षणात दरिद्री कोट्याधीश होतो. करोडपती भिक्षाधीक्ष होतो. मृत्युही जीवन आहे. जीवनात मृत्यु आहे. लहान थोर, आप-पर सारे भेद मनातून नष्ट कर. सारे तुझे आहे. तू सर्वांचा आहेस !*

✿ *तू शरीर नाहीस, शरीर तुझे नाही. तू शरीराचा नाहीस. शरीर हा पंचभूतांचा मिलाफ आहे. त्यातील आत्मा हाच शाश्वत आहे !*

✿ *स्वतःचे सर्वस्वसमर्पण भगवंताचे ठायी तू कर. तोच एक आश्रयस्थान, शरण्यधाम आहे. त्याला जाणून तू भय, शंका, शोक दुःखातून मुक्त हो. प्रत्येक कर्माची 'हरि ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' या भावनेने भगवंताचे चरणी आहुती दे. हा कर्मयोगाचा महान यज्ञ आहे यातच जीवन मुक्तीचे सार आहे.*

✿ *गोविंद, परमानंद, शामसुंदर, नंदकुमार ! तू एक महासागार आहे. मी एक बिंदू आहे. तू मला आपल्या अंतरात समावून घे.*

# दिशा

**वर्ष पाचवे / अंक १० / सप्टेंबर २००४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक ३ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ऐका अधिक मासा तुमची कहाणी ! (अर्थात महिमा अधिक मासाचा) | आशा भिडे | ३ |
| २) | तर भारत पुनरपि जगाचे नेतृत्व करेल | शं. बा. मठ | ९ |
| ३) | डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो. दि. पराडकर | १४ |
| ५) | माधुरी, M.F. Hussein आणि सरस्वती | यशवंत साने | २२ |
| ५) | हंपी | सौ. मंजिरी दांडेकर | ३१ |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६० वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशी सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वाच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी/जाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी.

चेक ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी सह कळवावा.

# ऐका अधिक मासा तुमची कहाणी !
# (अर्थात् महिमा अधिक मासाचा)

*श्रावण महिन्याच्या आधी अधिक श्रावण येऊन गेला. हा अधिक महिना पुराणांच्या दृष्टिने कसा पुण्यप्रद असतो त्याबद्दलचा हा लेख. - संपादक*

आमच्या पिढीला अधिक मासाची थोडीफार तरी माहिती आहे पण आजच्या इंग्रजी माध्यमातील शाळेतून शिकलेल्या युवा पिढीला मात्र त्याबद्दल काहीच माहिती नाही. यावेळी श्रावण अधिक आहे. त्यामुळे श्रावणातील सणवार एक महिना उशीरा सुरू झाले. जावयाला अधिक महिन्याचे वाण द्यायचे असते. त्यामुळे पुण्य लाभते वगैरे गोष्टी घरात मोठ्यांच्या तोंडून युवा पिढीच्या कानावर पडत असतील पण ते तिकडे सोयीस्करपणे कानाडोळा करीत असतील. काय करायचं आहे जाणून ! आपला काय संबंध! असे विचार त्यांच्या मनात आलेही असतील पण आपली संस्कृती, सणवार, व्रतवैकल्य यांची महान भारतीय परंपरा अजिबात नामशेष होऊ नये. ती पुढच्या पिढ्यांपर्यंत पोचावी. जे अस्सल आदर्श, आदरणीय, अनुकरणीय असेल ते पुढच्या पिढीनं आचरावं, अनुसरावं म्हणूनच -

**'ऐका ऐका अधिक मासा तुमची कहाणी'**

सुमारे पावणे तीन वर्षांच्या कालावधीनंतर (म्हणजेच ३२ महिने, १६ दिवस, ४ घटका इतक्या कालखंडानंतर) जे वर्ष येते ते १३ महिन्यांचे असते आणि ज्या महिन्यात सूर्य संक्रांत नसते त्या महिन्याला अधिक मास म्हणतात. चैत्रापासून अश्विनापर्यंत कोणताही एक अधिक मास असू शकतो. पण मार्गशीर्ष, पौष, माघ व फाल्गुन हे कधी अधिक होत नाहीत. बारा वर्षातून एकदा चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे अधिक मास होतात. १८ वर्षांनी अधिक आषाढ व चोविस वर्षांनी अधिक भाद्रपद येतो. अधिक मासाला मलमास, पुरुषोत्तम मास अशी नावे आहेत. प्राकृतात त्याला धोंड्याचा महिना म्हणतात. यंदा हा अधिक महिना १८ जुलैपासून सुरू झाला . म्हणजेच यंदा श्रावण अधिक होता आणि म्हणून त्यानिमित्ताने या अधिक महिन्याची म्हणजे पुरुषोत्तम मासाची कहाणी सांगावी असे मनात आले.

श्रीविष्णूचे स्थान वैकुंठ आणि अधिक मासाची देवता पुरुषोत्तम. यांचे स्थान गोलोक. गोकुळातील यशोदानंदन कृष्ण हा गोलोकाधिपती श्रीकृष्णाचा अवतार व मथुरेतील देवकी कृष्ण हा वैकुंठाधिपती श्रीविष्णुचा अवतार असे भागवतात सांगितले आहे. अधिक मासाची सांगोपांग माहिती संस्कृत व प्राकृत ग्रंथात सांगितली आहे. पण आजच्या काळात सुटसुटीत व सर्वांना समजेल अशा पद्धतीने ही कहाणी तुम्हांला सोप्या भाषेत सांगणार आहे. या कहाणीच्या श्रवणाने व पठणाने सर्वांचे मनातील ईप्सित साध्य होते. मनोरथ पूर्ण होते. एकातून दुसरी व दुसरीतून तिसरी अशी ही कहाणी कथन केली आहे.

एकदा शौनकादि ऋषी सुताला म्हणाले की, हा संसार सागर तरून जाण्याचा साधा सोपा मार्ग आम्हांला सांग. तेव्हा त्याने पुढील कहाणी सांगितली. त्रिभुवन संचारी नारदमुनी एकदा हिमालयाजवळील बदरीकारण्यात पोचले. नरनारायण ऋषी तेथे तप करीत होते. नारद मुनींनी विचारले, 'आपण हे तप कोणत्या हेतूने करता? कृत, त्रेता व द्वापार युगात एकाने केलेल्या तपांचे पुण्य भोवतीच्या सर्व लोकांना मिळत असे व पापाची पण तीच गत होती. पण या कलियुगात जो तो आपापल्या पापपुण्याचा धनी असतो. मग आपण हे तप कशासाठी करता?

'मी एका महान ऋषींचे चिंतन करतो आहे' नारायण ऋषी म्हणाले.

'कोण हे ऋषी? सांगा तरी' नारद मुनी म्हणाले.

'त्याचे नाव पुरुषोत्तम ! नारदा, वर्षाच्या बारा महिन्यांचे बारा स्वामी असतात. पण सांप्रत तेरावा महिना येणार आहे. त्याचे नाव पुरुषोत्तम मास आणि त्या मासाच्या स्वामीचे नाव पुरुषोत्तम ऋषी. महातपोनिष्ठ ऋषी.' हे ऐकून नारद म्हणाले, मला ह्या नव्या मासाची कहाणी ऐकवा. मी मृत्यू लोकात जाऊन सर्वांना सांगेन. आजकाल मृत्युलोकात सुख-दु:ख, दारिद्र्य-वैभव, पाप-पुण्य या सगळ्याच्या बाबतीत मोठी विषमता आढळते. ती थोडी दूर होणे आवश्यक आहे.

ऋषी म्हणाले, 'ऐक तर, पूर्वी द्वापार युगात युधिष्ठिराने श्रीकृष्णाला हाच प्रश्न विचारला होता. जेव्हा द्यूत हरून पांडव वनवासात गेले त्यावेळी काम्यक वनात कृष्ण त्यांना भेटायला गेला होता तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले, 'अचानक एकदा तेरावा अधिक महिना उत्पन्न झाला. त्याला ना कोणाचा आधार ना पाठबळ. म्हणून लोक त्याला निंदू लागले. त्यामुळे दु:खित होऊन तो माझ्याकडे वैकुंठाला आला. त्याने आपली दुर्दशा ऐकवली. विधवेला ज्याप्रमाणे शुभकार्यात मज्जाव असतो. त्याप्रमाणे लोक मला टाळतात. हे त्याचे शब्द मला जिव्हारी लागले नि म्हणून मी त्याच्यासह गोलोकाला गेलो.

'हा कुठला लोक? मी ह्याचे नाव कधीच ऐकलेले नाही.' युधिष्ठिर म्हणाला.

'बरोबर आहे, स्वर्ग मृत्यू व पाताळ याशिवाय अंतरिक्षात आणखी तीन लोक आहेत. पहिला गोलोक त्याच्याखाली उजव्या बाजूला वैकुंठ लोक व डाव्या बाजूला शिवलोक. गोलोकाच्या मध्यभागी एक ज्योती व त्या ज्योतीत रत्नजडित सिंहासनावर एक दिव्य बालमूर्ती हाती मुरली धरलेली बसली आहे. त्या बालमूर्तीलाच पुरुषोत्तम ह्या नावाने ओळखतात. त्या कष्टी अधिक मासाला घेऊन मी ह्याच महात्म्याकडे गेलो. ही अधिक मासाची कहाणी ऐकून तो म्हणाला, 'श्रीकृष्णा, तू मी दोन का आहोत? आपण दोघे एकच. तेव्हा या अधिक मासाला मी माझे नाव देतो. या मासाचे नाव पुरुषोत्तम. अन् त्याचा मी स्वामी. आणि माझा असा वर आहे की जे या मासाचे पूजन करतील त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील! माणसाचा मुलापेक्षा नातवावर अधिक जीव असतो. त्याप्रमाणे माझ्या भक्तांपेक्षा ह्याच्या भक्ताबद्दल मला जास्त जिव्हाळा वाटणार, तेव्हा पावणेतीन वर्षांनी येणाऱ्या ह्या पुरुषोत्तम मासात जे स्नान, दान, पूजा, जप करतील त्यांच्यावर मी प्रसन्न होईन ! ह्याला मी सर्व मासांचा अधिपती केले आहे. आता तू याला घेऊन खुशाल वैकुंठाला जा. ' अशा रीतीने मलमास-धोंड्या महिना म्हणून हिणवला गेलेला अधिक मास मोठा सामर्थ्यवान असा श्रेष्ठ मास झाला! 'अंगात चिकाटी, गुण असले आणि योग्य व्यक्तीचे पाठबळ मिळाले की असा रंकाचा राव होतो.' श्रीकृष्ण म्हणाले.

'अन् आम्ही रावाचे रंक होऊन पडलोय.' युधिष्ठिर चुटपुटला.

'बाबारे, त्यालाही तसेच कारण आहे. तुम्ही वनवास भोगत आहात पण अशावेळी सुद्धा नित्य नैमित्तिक कर्मे, धर्म हे सारे पाळायलाच हवेत. तुम्ही वनात आल्यावर दोन तीनदा हा पुरुषोत्तम मास येऊन गेला. पण या ना त्या कारणाने तुम्ही कोणी त्याचे पूजन केले नाही. बाकी तुम्हाला तरी दोष का म्हणून द्यायचा? दैव फिरले की माणूस असा स्थानभ्रष्ट व्हायचाच. विधिलिखित कोणाला टाळता येते का? थांब तुला मी द्रौपदीच्या पूर्वजन्मीची कथा सांगतो. म्हणजे ह्या जन्मीच्या अनेक दु:खद घटनांचा तुला उलगडा होईल.

### पाच पांडवांची पत्नी

द्रौपदी मागील जन्मी मेधावी ब्राह्मणाची कन्या होती. तिची आई लवकर वारली. नंतर तोही वारला. तेव्हापासून ही सुंदर व सुशील बुद्धिमती कन्या फार उदास झाली. एकदा दुर्वास ऋषी तेथे आले. तिची हकीकत ऐकल्यावर म्हणाले, 'बाळे, लवकरच पुरुषोत्तम मास येईल त्यावेळी तू पुरुषोत्तम व्रत कर म्हणजे तुझे मनोरथ पूर्ण होतील व तुला मनपसंत पती लाभेल.'

तिला त्यांचे म्हणणे पटले नाही. वैशाख,कार्तिक, माघ इ. महिन्यात व्रत करतात तिला माहीत होते. पण ह्या हलक्या अधिक मासाचे व्रत काय करायचे? असे तिने दुर्वासांना विचारले. तो कोपिष्ट मुनी भडकला, म्हणाला, 'मुली, तू त्या पवित्र पुरुषोत्तम मासाचा अपमान केला आहेस. तेव्हा पुढील जन्मी ह्याचे प्रायश्चित तुला भोगावे लागेल.'

मग तिने शंकराची उपासना केली. शंकर प्रसन्न झाले, म्हणाले, 'वर माग.' ती आवेशाने म्हणाली, 'देवा मला पती दे, पती दे,पती दे, पती दे, पती दे.'

शंकर 'तथास्तु' म्हणाले, 'वत्से तू पाच वेळा 'पती दे' म्हणालीस म्हणून तुला पाच पती मिळतील.'

हे ऐकून ती ब्राह्मणकन्या सुन्न झाली. ती म्हणाली, 'असे विपरित का बोलता? स्त्रीला कुठे पाच पती असतात का? असला लाजिरवाणा वर का दिलात मला?'

शंकर म्हणाले, 'बाळे हा वर पुढील जन्मी सुफळ होईल. तू त्या तापट दुर्वासांचा अपमान केलास. पवित्र पुरुषोत्तम मासाला नावे ठेवलीस. त्याचा हा परिणाम ! त्याला माझा नाईलाजच आहे.

'हे शंकराचे बोलणे ऐकून ती स्तंभित झाली, खेद करू लागली. त्यातच ती मरण पावली आणि द्रुपद राजाच्या यज्ञकुंडातून जन्माला आली व द्रौपदी म्हणून प्रसिद्धी पावली अन् पूर्वजन्मीच्या त्या वरानुसार तिला पाच पती लाभले ! ऐकलास पुरुषोत्तम मासाचा हा असा महिमा आहे बरं युधिष्ठिरा. तेव्हा येत्या पुरुषोत्तम मासात स्नान, दान, जप इ. करा म्हणजे त्यायोगे तुमचे कल्याण होईल. वनवासातले चौदावे वर्ष संपताच तुमचा भोग सरेल. मी तुमचा पाठीराखा आहेच. पण तुम्ही व्यवस्थित नेमधर्म पाळलात म्हणजे मी तुम्हांला पूर्ण सहाय्य करू शकेन. म्हणजे कोणी म्हणायला नको की मी तुमचा भलताच पक्षपात करतो. तुमची तेवढी लायकी आहे म्हणून मी तुमची बाजू घेतो हे जगाला पटायला हवे म्हणून तुम्ही हे 'पुरुषोत्तम व्रत' पाळा म्हणजे मी तुमच्या शत्रूंचा चुटकीसरशी संहार करीन.'

ही कथा सांगून श्रीकृष्ण द्वारकेला गेले. पुढे पुरुषोत्तम मासात पांडवांनी योग्य व्रताचरण केले. त्यामुळे शत्रूंचा नाश झाला. त्यांना त्यांचे राज्य लाभले.

नारायणमुनींनी नारदाला ही कथा अशा रीतीने सांगितली. पुरुषोत्तम मासाच्या पावित्र्याबद्दल नारदाच्या मनात अजूनही शंका असल्यास ती फेडावी म्हणून नारायण ऋषींनी दृढधन्वा राजाची कथा सांगितली.

### कोण्या पुण्याचा प्रभाव

पूर्वी दृढधन्वा नावाचा शूर, उदार, बुद्धिमान राजा होता. त्याला गुणसुंदरी पत्नी, चार पुत्र व एक कन्या होती. त्याच्या मनात शंका येई कोणत्या पुण्यामुळे मला हे वैभव मिळाले? मी तर जप, तप, होम हवन काहीच केलेले नाही. एक दिवस शिकारीला गेला असता त्याने एका हरणाला बाण मारला. बाणासह हरीण पळत सुटले. त्याच्या गळणाऱ्या रक्ताच्या मार्गावरून राजा धावू लागला. उन्हाची वेळ होती. तो दमला. तिथल्या सरोवराचे पाणी प्यायला. घोड्याला पाजले अन् वटवृक्षाच्या छायेत निवान्त बसला. एवढ्यात एक पोपट झाडावरून पुनः पुनः ओरडून म्हणू लागला, 'राजा तू भूतलावरच्या दृश्य सुखांना भुलून पारमार्थिक तत्त्वाला कसा विसरलास?' नंतर राजा आपल्या नगराला गेला. पण पोपटाचे शब्द त्याला पुनः पुन्हा आठवत तो भ्रमिष्टागत बसून राही.

पुढे एकदा वाल्मिकी ऋषींना त्याने आपली शंका त्यांना विचारली. 'कशामुळे मला ही सर्व सुखे व वैभव प्रपात झाले?' वाल्मिकी ध्यानस्थ बसले मग त्यांनी त्याला पुढील कथा सांगितली. 'राजा तुझे गतजन्मीचे पुण्य फळाला आलेय. तू गतजन्मी द्रविड देशी सुदेव नावाचा ब्राह्मण होतास. तुझी पत्नी गौतमी सुशील पतिव्रता होती. पण तुम्हांला मूलबाळ नव्हते. त्यामुळे तू दु:खी होतास. गौतमी म्हणे पुत्रापायी लोकांना किती दु:खे भोगावी

लागतात त्यापेक्षा निपुत्रिक बरे. पण जर तुम्हांला पुत्र हवाच असेल तर श्रीहरीची आराधना करा.

त्याप्रमाणे तुला श्रीहरी प्रसन्न झाला. तू पुत्रप्राप्तीचा वर मागितलास. पण तुझ्या नशिबी पुत्रसुख नसल्याने श्रीविष्णूने नकार दिला. गरुडाने मध्यस्थी करून म्हटले, 'तुम्ही त्याला पुत्र सोडून सगळे वैभव द्यायला तयार झालात. पण जो गजेंद्र देऊ शकतो तो अंकुश का देऊ शकणार नाही? देवा तू याचे मनोरथ नाही पुरवणार तर कोण पुरवेल? मग भक्तांचा विश्वासच उडेल भगवंतावरचा. तेव्हा तुम्ही याला पुत्रप्राप्तीचा वर द्याच.'

श्रीहरीने गरुडाचे म्हणण्यानुसार सुदेवाला पुत्रप्राप्तीचा वर दिला पण त्याच्यापायी त्याला दुःख सोसावे लागेल ! पुढे त्याला चतुर, हुशार मुलगा झाला त्याचे नाव शुकदेव ठेवले पण बाराव्या वर्षीच तो पाण्यात बुडून मेला. तुम्हा उभयतांना पुत्रशोकाचा जबर धक्का बसला. एक महिनाभर उघड्यावर त्याचे प्रेत मांडीवर घेऊन तुम्ही शोक सागरात बुडालात. माया वेडी असते म्हणतात ते खोटे नाही. सततधार पावसात तुम्हांला सचेल स्नान घडले. अन्नपाणी त्यागल्यामुळे तुम्हांला महिनाभर उपवास घडला.

मग महिना उलटला अन् अमावस्येच्या दिवशी श्रीहरी प्रगटले. त्यांनी मुलाला उठवले व वरदान दिले की या जन्मी तुम्हांला सुख लाभेलच पण पुढच्या जन्मी तू दृढधन्वा नावाचा राजा होशील तुला गुणसुंदरी पत्नी लाभेल...' अन् खरेच तसे झाले !'

हा सकारण चमत्कार घडला. कारण तो अधिक महिना होता. पुरुषोत्तम मास. त्या मासात एक उपवास घडला तरी पापे धुऊन जातात. एक स्नान घडले तरी सर्व तीर्थस्नानाचे फल मिळते. मग तुम्ही तर महिनाभर पर्जन्यस्नान केलेत नि अखंड महिनाभर उपवास केलेत. त्या पुण्याचा पुढल्या जन्मी प्रभाव पडला आणि तो पोपट म्हणजे शुकदेव बरं का ! त्याला गतजन्मीचे स्मरण होते म्हणून त्याने ते शब्द उच्चारून तुला सावध केले. तुम्ही सुखाचा उपभोग घेताना भगवंताचे नामस्मरण विसरलात तर विनाश होईल. असा सूचक इशारा दिला. कळले का राजा? नकळत अग्नीवर पाय पडला तरी पोळल्यावाचून रहात नाही त्याप्रमाणे अनवधानाने पुण्य घडले तरी ते इष्ट फल दिल्यावाचून रहात नाही.' एवढे सांगून वाल्मिकी जायला निघाले.

'थांबा मुनिवर.' राजा म्हणाला, 'आता आपण जो पुरुषोत्तम मासाचा उल्लेख केलात त्याचा पूजाविधी आम्हाला सांगून जावे.'

'पूर्वी लक्ष्मीने विष्णूला हाच प्रश्न विचारला होता. तेव्हा श्रीहरी जे वदला तेच मी तुला सांगतो ऐक' वाल्मिकी म्हणाले.

### गोप्रदान

लक्ष्मी विष्णूला म्हणाली, 'आपल्या आवडत्या पुरुषोत्तम मासात कसली दाने, कोणाची पूजा व कोणती व्रते करायची ती कशी आचरायची हे सगळे एकदा सविस्तर सांगा.

'या मासात अनेक वस्तूंचा व सवयींचा त्याग करायचा हे व्रत धरायचे अप्रूप उर्फ अनारसे ह्या खाद्य पदार्थाचे दान व इतर अपूर्वाईच्या पदार्थांचे दान द्यायचे. दीपदान, सवास गोप्रदानही देतात. आवळ्याचाकल्क लावून केलेल्या धात्री स्नानाचा नेमही करतात.'

'उपवासाचे कोणते बरे नेम नियम आहेत?'

'ज्याला सोसेल त्याने महिनाभर उपवास करावा. नाहीतर एक दिवसाआड करावा, नाहीतर एक वेळ जेवून करावा. कोणी मौन भोजन करतात. हे व्रत फार चांगले असते. त्यामुळे पुढ्यात असलेल्या अन्नब्रह्माची निंदा केली जात नाही.'

'गोप्रदानाचे महत्त्वही सांगावे.'

आपल्या गोपालकृष्णाच्या अवतारातील लीलांची आठवण होऊन श्रीविष्णू म्हणाले, 'त्रिभुवनात गाई एवढे थोर दैवत दुसरे नाही. गोमातेच्या उदरात चौदा भुवने वास

करतात त्यामुळे तिला स्पर्श केल्यास पापाचे भस्म होते. तेहेतीस कोटी देव तिच्यात वास करतात, तिचे शेण, गोमूत्र पवित्र औषधी असते. तिच्या दूध-दही, तुपाने यज्ञविधी पार पडतात. गाय व ब्राह्मण दोन्ही अतिपवित्रच जगात पण ब्राह्मणापेक्षा गाय पवित्र व अधिक श्रेष्ठ. संबंध महिनाभर दीप पाजळावा आणि अमावस्येच्या दिवशी ब्राह्मण भोजन घालावे. गोदान, भूदान, सुवर्णदान केल्याने जे फळ मिळते ते मोक्षप्राप्तीचे फळ अधिकमासात केलेल्या या दीपदानाने मिळते. ह्याबद्दल एक कथा ऐक -

पूर्वी मथुरापुरात शकली ब्राह्मण राहत असे. त्याला दोन बायका विमला व सुशीला. सुशीला नदीवर पाणी आणण्यासाठी गेली असता नदीवर नगरातील लोकांची खूप गर्दी उडालेली दिसली. घरी येऊन तिने पतीस विचारले, 'आज कसला पुण्यकाळ आहे? यमुनास्नानाचे विशेष प्रयोजन काय?'

'अग आज विष्णूला प्रिय अधिकमास सुरू झाला म्हणून माणसे स्नान दान व्रते करीत आहेत. या काळात जो कोणी माणूस त्या पुरुषोत्तमासमोर दीप लावेल तो जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचा मुक्त होईल.' शकली म्हणाला आणि त्याच्या बायकोने रोज पुरुषोत्तमास दीप लावण्याचे चालू केले. पण तिच्या सवतीला ते पाहवले नाही. ती त्यात विघ्ने आणू लागली. कधी तेलच काढून टाकी दिव्यातले तर कधी फुंकरीने, पदराने दिवा विझवी. सुशिला मात्र पुन्हा पुन्हा दीप पाजळी. अशा रीतीने अमावस्येपर्यंत व्रत निभावून उद्यापन करून ब्राह्मण भोजन घातले.

काही काळानंतर विमला हाल हाल होऊन मेली व सुशीला मात्र सुखासमाधानाने जगली व सौभाग्याने वैकुंठाला गेली, असा असतो दीपदानाचा महिमा. आता आणखी एका शूद्राची कशी दीपदानामुळे पापापासून मुक्तता झाली ती कथा सांगतो - ऐक -

**पुण्याचे दान**

सौभाग्य नगरात चित्रबाहू राजा राहत होता. तो शूर सत्यभाषणी होता. त्याची राणी चंद्रकला त्याला शोभेशीच होती. एकदा अगस्तीमुनी तेथे आले. राजाने पूजा केली, व राज्य त्यांना अर्पण केले. मुनींनी ते स्वीकारून त्याला परत केले. राजाने त्यांना प्रश्न केला. 'आपण भूत भविष्य जाणता मग मला सांगा की मला हे वैभव व पतिव्रता पत्नी कशाच्या बळावर मिळाली?'

मुनींनी ध्यान लावले व म्हणाले, 'गतजन्मी चमत्कार नगरीत तू मणिग्रीव नावाचा शूद्र म्हणून राहत होतास. हीच चंद्रकला सुंदरी ह्या नावाची तुझी पत्नी होती. तू दुराचारी होतास पण बायको तुला सावरून घेऊन सेवा करायची. तुझ्या दुर्गुणापायी लोकांनी तुला वाळीत टाकले. तिथल्या राजाने तुझे द्रव्य हरण केले म्हणून तू अरण्यात जाऊन तिथल्या जीवांना मारून पत्नीसह उदरभरण करू लागलास.

एकदा उग्रदेव नावाचा तपस्वी ब्राह्मण प्रयागास जाताना रस्ता चुकल्यामुळे अरण्यात आला. तो भुकेला होता. तू त्याला झोपडीत नेऊन फळे खाऊ घातलीस. नंतर तुझी हकीकत विचारली व म्हटले, 'तुझ्या ह्या पाहुणचार करण्यामुळे तुझे इथून पुढे कल्याण होईल. ह्यानंतर तिसरा महिना पुरुषोत्तम मास येईल. त्यावेळी तुम्ही उभयता स्नान करून रोज पुरुषोत्तमासमोर दीप पाजळा म्हणजे तुमचे दुःख कष्ट नाहीसे होतील. त्याप्रमाणे तुम्ही वागलात त्यामुळे तुम्ही मरणोत्तर स्वर्गात सुखे भोगून मृत्युलोकी चित्रबाहू राजा व चंद्रकला राणी झालात.'

असे दीपदानाच्या पुण्याने शूद्राला राज्यपद लाभले. या मासात केलेले पुण्य दुसऱ्याला देऊन त्याचा उद्धार करता येतो. मग भगवान विष्णूंनी स्मितविलासिनी ह्या कुबेराच्या आवडत्या अप्सरेची गोष्ट लक्ष्मीला सांगितली.

इंद्रलोकीची अप्सरा एकदा सख्यांसह क्रीडा करण्यासाठी मृत्युलोकी कुरुक्षेत्रात आली. तेथे तिने सुगंधी फुलांचा हार गुंफला. पण तो गळ्यात घालावा, असा

कोणीच अनुरूप पुरुष आढळेना. एवढ्यात दुर्वास ऋषी तेथे आले नि वेड्या अप्सरेने विचार न करता हार त्यांच्या गळ्यात घातला. दुर्वास ऋषी आधीच तापट त्यांनी तिला शाप दिला की, 'पिशाच्च होऊन तू पृथ्वीवर भटकत रहा.' तिने दुर्वासाची क्षमा मागितली. ते रागीट होते तरी शरणांगताला क्षमा करणे हे त्यांचे ब्रीद होते. त्यांनी तिला उःशाप दिला, 'दक्षिण दिशेला कुमारी क्षेत्रावर एक याज्ञवल्क्य कुळातील स्त्री तपाचरणासाठी येईल त्या काळात अधिक मास आला की ती स्नान, दान, दीपार्चन, उपवास इ. व्रते करील. अधिक मासातील कृष्ण द्वादशीच्या दिवशी तू तेथे जाशील. तिला भक्षण करण्याच्या हेतूने. पण तिच्या तपाने तुला गतजन्मीचे स्मरण होऊन तू तिला शरण जाशील आणि एका अधिक मासातील व्रताचे पुण्य तुला देऊन ती तुझी शापापासून मुक्तता करील.' आणि तसेच घडून आले. असेच अधिक मासात केलेल्या स्नानाच्या पुण्याच्या जोरावर एका भुताला मुक्ती मिळाली.

अशा रीतीने श्रीविष्णूने लक्ष्मीला अधिक मासाच्या महिम्याची सांगोपांग माहिती दिली. ती तू सर्व ऐकलीच आहेस तेव्हा तसेच आचरण ठेव असे वाल्मिकी ऋषी दृढधन्वाला म्हणाले. मग राजा वानप्रस्थाला निघाला. राणी गुणसुंदरी म्हणाली, 'मी पण येते. कारण पती हे सतीचे मुख्य दैवत. सुनेच्या राज्यात राहणारी स्त्री म्हणजे निव्वळ दुसऱ्याच्या घरात राहणारी कुत्रीच! पुत्र, बंधू किंवा पिता स्त्रीला मोजकेच देतात. अमाप देणारा केवळ पतीच. तेव्हा मी ही बरोबर येते.' मग थोरल्याला गादीवर बसवून ते वनात गेले व आपल्या जन्माचे सार्थक केले.

सूत शौनकादिमुनींना म्हणाला, 'नारायण मुनीचे हे विवेचन ऐकून नारद मुनीला समाधान वाटले. मग त्यांनी मृत्युलोकात जाऊन ही कहाणी अनेकांना सांगितली. लोकांनी त्याप्रमाणे वागून स्वतःचे कल्याण करून घेतले.

दान दिल्याशिवाय मिळत नाही, पेरल्याशिवाय उगवत नाही. हा निसर्गाचा नियम आहे. गतजन्मीचे पुण्य या जन्मी सुखश्वैर्य देते. श्रीमंतानीच नाही तर गरिबांनीही थोडा तरी दानधर्म करावा. तो न केल्यामुळेच ही निर्धनता प्राप्त झाली आहे हे लक्षात ठेवावे. अधिक मासातले दान सहस्रपटीने फल देते हे शास्त्रवचन आहे. अधिक मासात दीपदान केले की फार मोठे पुण्य लाभते.

हे वंध्येचे वंध्यत्व हरिते । स्त्रियांलागी अवैधव्य करिते ।<br>
राज्यभ्रष्टाते राज्य देते । आणि पुरविते चिंतितार्थ ।<br>
याचेनि कन्येलागी तत्त्वतः । दीर्घायू गुणी लाभतो भर्ता ।

अशी दीपदानाची फळे सांगितली आहेत. अन्नदान व उपवास अधिक मासात केल्यास पुण्यलाभ होतो. दान नेहमी सत्पात्री करावे.

रामनामाचे जे स्मरण । या नाव गा महामौन । मौनभोजनाच्या वेळी रामनामाची जोड द्यावी म्हणजे खरे पुण्य लाभते असे एकनाथांनी भागवतात म्हटले आहे. अधिक मासात स्नान दान तप करणे झेपणारे नसेल त्यांनी हरिनामाचे संकीर्तन करावे. कलियुगात हे फार सोपे व मोठे पुण्य कर्म आहे. या मासात आवडत्या वस्तूचा त्याग करून मग ती वस्तू सत्पात्री दान करावी. श्रद्धा नसणाऱ्यांनी पण ही व्रते करावीत. त्यामुळे शरीराला व मनाला संयमाची सवय होईल. म्हणून प्रत्येकाने यातले एक तरी व्रत करावेच. २९ जूनच्या आषाढी एकादशीपासून चातुर्मास सुरू झाला. त्याकाळातही अशीच व्रते करावीत व पुण्य जोडावे.

ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.



**आशा भिडे**<br>
बी/९, विजय अपार्टमेंटस्,<br>
'आराधना' टॉकिजजवळ,<br>
ठाणे (प.) - ४०० ६०२.<br>
दूरध्वनी : २५४१ ०१४०

# तर भारत पुनरपि जगाचे नेतृत्व करेल

*भगवान श्रीकृष्णाचे वास्तव चरित्र काय होते, याचा अभ्यासपूर्ण विचार मांडणाऱ्या लेखमालेतील हा सातवा लेख*
*- संपादक*

**(लेखांक सातवा)**

श्रीकृष्णाच्या जीवनाचे तत्त्वज्ञान काल मर्यादेने अंकित नाही. श्रीकृष्णाबद्दलचा एक श्लोक आपण नेहमी म्हणतो. त्या श्लोकाच्या अनुराधाने त्याच्या जीवनाचा व तत्त्वज्ञानाचा विचार करता येईल.

*वसुदेव सुतं देवं कंस चाणूर मर्दनम् ।*

*देवकी परमानन्दं कृष्णं वन्दे जगत् गुरुम् ।*

श्रीकृष्ण तेजस्वी वसुदेवाचा पुत्र होता. तो महान् कर्म करण्यासाठी अवतरला होता. याची जाणीव असुर व दुष्ट यांचा संहार करून त्याने दिली आहे. तो माता देवकीला परमानंद देणारा होता. या तीन चरणात श्रीकृष्णाचे अलौकिक सांस्कृतिक व कौटुंबिक जीवनाचे चित्रण केलेले आहे. शेवटचा चरण सर्वांहून महत्त्वपूर्ण आहे. तो म्हणजे श्रीकृष्ण सर्व जगात गुरुस्थानी राहिलेला आहे. श्रीकृष्ण केवळ गोपी, वैष्णवभक्ती, हिंदू जनता, भारतवासीय यांचाच नाही तर प्रत्येक मानवाचा गुरु आहे. दृश्य विश्वाचा गुरु आहेच भविष्य काळात काही ज्ञात विश्व आढळले तर त्याचाही तो गुरु आहे. थोडक्यात तो अखिल विश्वाचा गुरु आहे.

**चिरंतन काळाचा विश्व गुरु**

जगात उपदेशकांचा तोटा नाही. श्रीकृष्णाच्या जीवनात विशिष्ट काही तत्त्वे आहेत. त्याची शक्ती, त्याचे सामर्थ्य, त्याची संस्कारिता. त्याने संसारात दु:खी बनलेल्या मानव जातीला जीवनाचा नवा संदेश दिला. प्रशान्त मानवतेचा तो वाटाड्या होता. त्याने उपदेशलेली गीता पीडित मानवाला दिव्य संदेश देत आहे. जगाला नेहमीच प्रेरणा व मार्गदर्शन करणारा गीता ग्रंथ आहे. श्रीकृष्ण आत्मविश्वास व आत्मश्रद्धेचा दिव्य संदेश गीतेद्वारे देतो.



त्या ग्रंथाने प्रत्येकाला चिरस्थायी आत्मिक संदेश दिला होता. तो मिळत राहील व मिळत आहे. धर्माचा संदेश देताना तो म्हणतो -

'धर्माचा अर्थ संकुचित करून चालणार नाही. जगाचे स्थैर्य राखण्यासाठी व नैतिक जीवनात स्थिरता आणण्यासाठी प्रभू अवतार घेतो. धर्मसंस्थापनार्थाय याचा अर्थ ही धर्माची घडी नीट करण्यासाठी भगवंत अवतरतो.'

**गीतेची अलौकिकता**

या ग्रंथावर सर्वच आचार्यांनी आपआपल्या परंपरेप्रमाणे भाष्ये लिहिली आहेत. गीतेला उपनिषदांच्या मंथनाने काढलेले अमृत असे 'गीता महात्म्यात' म्हटले आहे. केवळ गीतेच्या परिशीलनाने शास्त्राने प्रतिपादन केलेले मानवी जीवनाचे इति कर्तव्य प्राप्त होऊ शकते असे निश्चयाने सांगितलेले आहे. यां सर्व आचार्यांची भाष्ये वाचणे आवश्यक आहे. शिवाय विविध भाषेत लिहिलेली विचारवंतांची भाष्येही महत्त्वाची आहेत. वानगीदाखल काही भाष्यांचा उल्लेख केला आहे.

संस्कृत - मधुसूदन सरस्वती (शांकर सांप्रदायी) गीतेवरील भाष्य

मराठी - १. लो.टिळक - गीतारहस्य, कर्मयोगाचे प्रतिपादन

२. भावार्थ दीपिका - श्री ज्ञानदेव

३. मंत्रार्थदीपिका - श्री तुकाराम महाराज

४. यथार्थ दीपिका - श्री वामन पंडित

५. गीतार्णव - दासोपंत गोस्वामी सव्वा लाख ओव्यांचा ग्रंथराज

६. गीतातत्त्वमंजरी - श्री तात्यासाहेब करंदीकर

७. पुरुषार्थ बोधिनी टीका - पं. सातवळेकर

८. गीताप्रवचने - श्री. विनोबा भावे

इंग्रजी - ९. अनासक्ती योग - महात्मा गांधी

१०. गीतेवरील निबंध - श्री अरविंद

११. डॉ. ॲनी बेझंट

१२. डॉ. राधाकृष्णन्

१३. श्री. गुरुदेव रानडे - साक्षात्कारवाद

आणखी काही ग्रंथ - १४. श्री. सेनापती बापट, श्री. कवीश्वर इत्यादी.

**सद्य स्थिती -**

आज आमचे स्वतंत्र राज्य उत्पन्न झाले आहे. गेली दीडशे वर्षे परकीय सत्ता होती. या भारतीय राष्ट्राचे पुनर्निर्माण कसे करावे. येथील समाज जीवनाची पुनर्घटना कोणत्या पद्धतीने करावी हे प्रश्न आमच्या समोर उत्कटतेने उभे आहेत. आमचे राष्ट्रजीवन बनून सिद्ध व्हावयाचे आहे. जुनी निष्ठा, जुनी मूल्ये भंगून गेली. नव्या निष्ठा झाल्या नाहीत. आपली मूल्ये टिकविणे भारताला का शक्य होत नाही? भारतात शिक्षण योग्य पद्धतीने दिले गेले पाहिजे. सांप्रत शिक्षण पाश्चात्य वळणाचे आहे. प्रतिष्ठा, मान, पैसा या तिहींची त्याच्याशी विलक्षण सांगड असल्याने भारतीय पिढीला त्याच्याकडे वळणे क्रमप्राप्त आहे. परकीय अमलाच्या वेळी अध्यात्म वाईट, संस्कृती, रानटी, धर्म टाकाऊ, पूर्वज नादान असे शिक्षण दिले गेल्याने वरील गोष्टी पूर्णपणे बिंबल्या आहेत. हा देश स्वतंत्र झाला असला तरी या देशातील स्वतंत्र राजकीय धारणा व सामाजिक पुनर्घटनेच्या कल्पना या पाश्चात्त्य स्फूर्तीतल्या आहेत. राज्य घटनेच्या ज्या स्वरुपाचा आपण पुरस्कार करीत आहोत ते पाश्चात्य लोकतंत्राचे आहे. पाश्चात्त्य लोक तंत्रवादच आपल्या सर्वात भिनला आहे. साम्यवादी प्रवाहाचे उगमस्थानही पाश्चात्त्य मार्कस् ऐंजिल लेनिन यांच्या विचारसरणीतून आहे. भारतीय स्वतंत्र राज्य निर्माण झाले असले तरी राष्ट्र अद्याप निर्माण व्हावयाचे आहे. हिंदुस्थानात आज प्रभावशाली असणाऱ्या या दोन विचारप्रवाहातून घडण होत आहे. या दोनही प्रवाहांनी युरोपमध्ये उत्पन्न केलेल्या घटनेचे जे फलित आहे त्याहून वेगळे फलित हिंदुस्थानात मिळू शकणार नाही.

**यांत्रिक भोगवादी जीवन**

यंत्र म्हणजे सुसंस्कृतता नव्हे. ती सुधारणा होय. यंत्राच्या सहाय्याने मिळणारी अतिश्रेष्ठ परिस्थिती माणसास लाभू शकेल. तो आकाशात संचार करील, पाणी तरून जाईल, एकाच ठिकाणी बसून दूर दूरच्या ठिकाणी संदेश पाठवू शकेल अगर दूरचे ऐकू वा पाहू शकेल. परंतु इतक्या गोष्टी करूनही तो सुसंस्कृत माणूस असेल असे म्हणता येणार नाही.

आज जगातील तत्त्वचिंतकांना भौतिक वादाची भयानकता जाणवू लागली आहे. त्याला थोपविण्यासाठी तात्त्विक अधिष्ठान असलेला धर्म हवा आहे. मानव स्वत:च्या जीवनामध्ये नेहमीच धर्मातून कर्तव्य कर्माची प्रेरणा मिळवीत आलेला आहे. यांत्रिक युगाने मानवला यंत्रासारखा बनवून टाकला आहे. यंत्र कर्माची प्रेरणा देवू

शकत नाही. जगात आजही दु:ख, पीडा, त्रास, यातना यांचे तांडवनृत्य चालू आहे. या त्रस्त झालेल्या मानव जातीला या यातनांशी सामना करायला कोण प्रेरणा देणार?

याबाबत काही बुद्धिवादी सांगतात, कर्माची प्रेरकशक्ती व्यक्तिगत स्वार्थ आहे. दुसरे काही बुद्धिवादी उच्च व्यक्तिगत स्वार्थाच्या गोष्टी बोलतात. असा केवळ व्यक्तिगत स्वार्थ जगात पवित्र, शांत व प्रेमाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रेरणादायी बनेल का? उच्च व्यक्तिगत स्वार्थ हा देखील स्वार्थच पहात असल्याने जगाचे आत्यंतिक कल्याण करण्यासाठी किंवा निरपेक्ष सत्कर्मे करण्यासाठी प्रेरणा देईल काय? ही यंत्रशक्ती सत्कर्माऐवजी मानवाचा विनाशच करणारी ठरली आहे.



या ध्वंस कार्यात मानव जातीला शांती, संतोष, पवित्रता व आनंद देईल असे कोण आश्वासन देवू शकेल? अशा मानवाला या यमयातनेतून वर उठविण्यासाठी आध्यात्मिक शक्तीची आवश्यकता आहे. मानव भूतकाळातील विचारांनी जगू शकत नाही. वर्तमानकालीन भीषण परिस्थितीतून भविष्यातील सुखद विचारांनी तो दिवस घालवितो. मानवता व सद्गुण यांच्यावरील विश्वासामुळेच मानव अस्तित्वात आहे. सद्गुणांची सफलता, सुफलता यांच्यातून निर्माण होणारी शांती, संतोष व मंगलता याबद्दल त्याची श्रद्धा असल्याने तो भविष्य उज्वल असू शकेल असे म्हणतो.

### जागतिक धर्माची आवश्यकता

सांप्रत जागतिक स्तरावर जगाला एकत्र बांधण्याची प्रक्रिया चालू आहे. सर्व जगाची एकच राष्ट्रभाषा असावी असे विचारवंत बोलताना आढळतात. जगाच्या सुखदु:खापासून आज कोणत्याही राष्ट्राला अलग राहणे शक्य होणारे नाही. प्रत्येकाच्या सुखदु:खाशी आपले जीवन संलग्न आहे. सर्वत्र वासुदेवच आहे. 'सर्व वासुदेवं इति' हा विचार दृढ व्हावयास हवा. विश्वाची एकता साधल्याशिवाय दुसरा मार्गच नाही. अशा एकतेसाठी धर्म व आध्यात्मिक शक्तीही आवश्यक आहे. यंत्रशक्तीचे हे काम नव्हे. विश्वाला एकत्र बांधेल असा धर्म पाहिजे.

### या विश्वधर्माचे स्वरूप काय असावे?

धर्म बलावर वा छळावर पोसाला जात नाही. धर्म हा भक्तीवर आधारित असला तर तो चिरस्थायी ठरू शकतो. मानव प्रेम, व्यक्तिप्रेम, अखिल चराचरावर प्रेममय दृष्टी यावरच तो पोसला गेला पाहिजे तरच तो विश्वाला एकत्र बांधू शकेल व फलदायी होऊ शकेल. म्हणजेच वैश्विक धर्माच्या विशाल व व्यापक प्रेमात हे टिकून राहील. असा धर्म, सांप्रदायिक, संकुचित, प्रतिक्रियात्मक असणार नाही. हा धर्म निष्काम कर्मयोगावर आधारलेला असेल. सांप्रतचे केवळ संप्रदाय धर्म म्हणून मिरवतात त्या संप्रदायांना बाजूला सारून विचारवंतानी मानवाची खरी गरज काय आहे त्याचा विचारप्रवाह कोणत्या दिशेला धावत आहे याचे स्पष्ट दर्शन घडवावे. संकुचित विचारांचे वा सांप्रदायिक मतभेदांचे नामोनिशाण राहणार नाही अशा नि:स्वार्थी मानव सेवेचा म्हणजे निष्काम कर्मयोगाचा धर्मच विश्वधर्म बनू शकेल.

ही जागतिक आवश्यकता ज्या गोष्टीने पूर्ण होऊ शकेल तो जागतिक धर्म बनून राहील. श्रीकृष्णाच्या तात्त्विक विचारांनी जर जगाची आवश्यकता पूर्ण करू शकत असेल तर तो जगाला मान्य असा गुरू होऊ शकेल. भावी विश्वधर्मात नि:स्वार्थी मानव सेवेची आवश्यकता राहील. श्रीकृष्णाचे जीवन म्हणजे नि:स्वार्थ मानव सेवेचे मूर्तिमंत प्रतीक. श्रीकृष्ण कोणा एका सांप्रदायाचा वा व्यक्ती

समूहाचाच आराध्य देव नाही. तो जगाचा आराध्य देव आहे. जगद्गुरू आहे.

### गीता ग्रंथ विश्वाचा आधार

श्रीकृष्णाने पाच हजार वर्षापूर्वी सांगितलेल्या गीतेमध्ये अशी नि:स्वार्थ मानव सेवेची तरफदारी केलेली आहे. अहंवादाला गीतेने तिलांजली दिली आहे. गीतेची दृष्टी केवळ मानवावरच नाही तर प्रत्येक जीवमात्रावर आहे. गीतेतील विचार आजच्या विचाराहून एक पाऊल पुढे आहे. तो विचार केवळ नि:स्वार्थ मानव सेवेचाच नाही तर सर्वभूतमात्राच्या हिताच्या गोष्टी करतो. 'सर्वभूत हितेरता:।' अर्थात् मानवासह सर्व भूतमात्रांची नि:स्वार्थीभावाने सेवा करावयाच्या गोष्टी श्रीकृष्ण करीत आहे. सामान्य विश्वधर्मासाठी आवश्यक सर्व तत्त्वे तिच्यात सामावलेली आहेत. तिच्यात कोणताही पक्ष वा पंथ उभारण्याच्या गोष्टी नाहीत. लोकांना अशा धर्माची तहान लागलेली आहे आणि ती गीतेद्वारे शमणे शक्य आहे. वैश्विक सभेलाही नि:स्वार्थी मानवसेवेचा आदर्श धर्माच्या मार्गदर्शनासाठी गीता ग्रंथच उपयोगी पडेल. विश्वशांतीसाठी असल्या धर्माची आवश्यकता आहे. जो व्यक्ती व समाज म्हणजे जागतिक स्तरावर आंतरिक व बाह्य विचारावर अंकुश ठेवू शकेल. व्यक्ती व समाज या दोहोंचा ज्याने विचार केलेला असेल तोच धर्म जीवनाला उपयोगी पडू शकेल. केवळ परलोकाचा विचार करणारे, केवळ इहलोकाचा विचार करणारे, काही इह परलोकाचा विचार करणारे सांप्रतधर्म आहेत. आपणाला आज इह परलोकाचा विचार करून सामाजिक स्थिरता आणणारा व व्यक्तीचा विकास करणारा सर्वांगीण धर्म हवा आहे. वैश्विक राजसभेच्या घटनेतही अशा धर्माचीच आवश्यकता आहे.

थोडक्यात जगाला कोणत्याही प्रकारची सांप्रदायिकता, संकुचितपणा वा पक्ष-पंथबाजी यापासून दूर अशा धर्माची गरज आहे. आग्रहविरहित धर्मच व्यक्तीचे, समाजाचे जीवन उन्नत करू शकतो. इहलोकात वा परलोकात मानवाला सुख, शांती, समाधान देऊ शकतो आणि असा धर्मच विश्वधर्म बनू शकतो.

### गीता अनाग्रही धर्म शिकवते

धर्मात कोणत्याही प्रकारचा आग्रह असता कामा नये, त्याचे सिद्धान्त बुद्धीवर घासून पूर्ण निरीक्षण झाल्यावर टिकू शकतील असे असले पाहिजेत. ज्या धर्माचे असे सिद्धान्त असतील तोच धर्म त्रिकाल टिकून राहतो व प्रतिकूल वावटळीत डगमगणार नाही. अशा धर्माचे मस्तक नेहमी उंच राहते. गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनालाच नव्हे तर समस्त मानवजातीला उद्देशून सांगितले आहे. गीतेत सांगितलेल्या गोष्टी बुद्धीवर घासून कस लावून पहा. नंतर तुम्हांला जमेल तसे करा. 'विमृश्य एतत् अशेषेण यथेच्चसि तथा कुरु' । जो या शिकवणुकीचे पूर्वग्रहरहित विचार करील तो जरूर त्याचा स्वीकार करील, अशी श्रीकृष्णाला संपूर्ण खात्री होती. अर्जुनाने सांगितले नष्टो मोह... करिष्ये वचनं तव । इथे संप्रदाय नव्हता म्हणून बिघाड होण्याचे कारण नव्हते. ज्यात व्यक्ती व समाज याचा मुक्त विचार करण्यात येतो, तोच मानवाचा धर्म बनू शकतो. असा अहंकार विरहित धर्म गीता समजावते म्हणून गीतेचा धर्म विश्वधर्म बनू शकेल असा आहे.

### गीतेत सर्वभूत हित दृष्टी

व्यक्तीबरोबर जागतिकतेचा विचार, त्याप्रमाणे मानव विकासाबरोबर सर्वभूत हितत्व गीता समजावून सांगते. शिवाय सर्व श्रीमंत, गरीब, विद्वान-अविद्वान, सद्गुणी-दुर्गुणी, सबळ-निर्बळ यांना एकाच बैठकीवर बसवून 'परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ' । एकमेकावर प्रेम करून स्वत:चे श्रेय साधा असा उपदेश गीतेतच आहे. विश्वाची नि:स्वार्थी सेवा हेच त्याचे मुख्य सूत्र आहे. आज जगाला जो धर्म पाहिजे, त्याची पूर्णता गीता करू शकते. श्रीकृष्ण केवळ भारतभूमीवर नाही तर जगाच्या गोलावर सुदर्शन

चक्र धारण करून उभा आहे, असे मानले तरच 'कृष्ण वन्दे जगत्-गुरुम्' हे वचन ध्यानात येईल.

विज्ञान व तंत्रज्ञानाने मानवावर उपकार केले आहेत. जर बुद्धीने तिचा सदुपयोग केला नाही तर हे विज्ञान ध्वंसाचेच कार्य करील. मग सर्व जगाचा ध्वंस झाल्यावाचून रहाणार नाही. जगाचा विनाश टाळण्यासाठी विश्वधर्माची कास धरणे आवश्यक. विश्वधर्माला जे अभिप्रेत आहे. अनहंवादित्व, सर्वभूत हितत्व व परस्पर सहृदयता या साऱ्या गोष्टी गीतेत सांगितलेल्या आहेत. या गोष्टी म्हणजे गीतेचे हृदयच होय.

जगाला आज वैश्विक धर्माची गरज भासत आहे. श्रीकृष्णाने गीतारुपी अमृत दिले आहे. ते वैश्विक स्वरुपाचे आहे. त्या अमृताने विश्वाची गरज निश्चित भागेल. हे अमृत सर्वांसाठी आहे.

**मनाने एक होऊया -**

विज्ञानामुळे जगाला एकत्र येण्याचे भाग्य लाभले आहे. मात्र हे भौतिक स्वरूपाचे आहे. मनाने एक करण्याचे काम ज्ञानाचे आहे. गीता जगाला मनाची, बुद्धीची, आत्म्याची एकता प्राप्त करून देते. हे काम धर्माचे आहे. गीता तेच करते. विचारवंतांनी हे काम करावयास हवे तीच श्रीकृष्णाची खरी स्मृती आहे. श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान जगाला आत्मसात करण्यास मदत केली पाहिजे कारण हे जगद्‌गुरूचे तत्त्वज्ञान आहे. ते सर्व जगासाठी आहे. कृष्णाच्या जीवनाची आपण या दृष्टीने समीक्षा केली पाहिजे. जगद्‌गुरू कृष्णाचे दर्शन जगाला घडले पाहिजे.

विज्ञान व धर्म यांचा संघर्ष हा अनावश्यक आहे. विज्ञानाला धर्माच्या कोंदणात बसविले पाहिजे म्हणजे तो विध्वंसक होणार नाही. हे काम नियतीने भारताकडे सोपविले आहे. भारतीय श्रीकृष्णाच्या आदर्शाचा, विचारांचा व त्यांनी प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानाचा पाठपुरावा करतील तेव्हा अशा विश्वधर्माची संस्थापना अस्तित्वात येऊ शकेल. सारे जग भारताकडे मार्गदर्शनासाठी आतुरतेने वाट पाहत आहे. भारतीयांनी या कार्यासाठी झटावे तेव्हाच भारताला जागतिक स्तरावर महत्पद प्राप्त होईल. तरच भारत जगाचे नेतृत्व करू शकेल.

*सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः*

*सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।*

आजच्या पिढीला श्रीकृष्णाचे महत्त्व विशद करून दाखविण्यासाठीच त्याचे जगद्‌गुरुत्व प्रकर्षाने मांडण्यात आले आहे.

कृष्णं वन्दे जगद्-गुरुम् ।
इति शम् ।
(इथे श्रीकृष्ण लेखमाला समाप्त)

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

बांदोडकर महाविद्यालयात विज्ञान शाखेतील महत्त्वपूर्ण व अभिजात ग्रंथांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी आयोजित केले होते. २६-२७ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. राजन गुप्ते, अरविंद विंशे याच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्‌घाटन झाले. या वेळी वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावरल, उपप्राचार्या मीरा अकोलकर उपस्थित होते. दोन दिवसात दीड ते दोन हजार विद्यार्थी, प्राध्यापकांनी पाहिले. प्रदर्शनास ग्रंथालयातील सहकाऱ्यांनी विशेष सहाय्य केले.

# डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन

## भाग - ४

तसं पाहिलं तर मी इतर अनेक प्रचारकांप्रमाणे हिंदीचा प्रचारकच होतो. कारण माझा विषय संस्कृत होता. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणे दादर विभागामध्ये अशा तऱ्हेने निरनिराळ्या विषयांवरची व्याख्याने होत असत. त्यावेळेला मला बोलावणं आवश्यक होऊन बसलेलं होतं. म्हणून ‘महाराष्ट्र राष्ट्रभाषेचे’ एक इथले अधिकारी त्यांचं नाव रामाग्रज (हे अर्थात टोपणनाव. त्यांचं मूळ आडनाव मांजरेकर) त्यांनी बोरिवलीला एक शिबिर घेतलं आणि त्यात ‘कविता कशी शिकवावी’ याच्याबद्दल मला बोलण्यास त्यांनी सांगितलं. मी खरं म्हणजे त्यांना सांगितलं की मी आहे मुंबई हिंदी विद्यापीठाचा. तेव्हा हे ‘महाराष्ट्र राष्ट्रभाषा’वाल्यांना आवडणार नाही. पण ते म्हणाले, ‘सर, मी तुम्हाला तुमचा विद्यार्थी म्हणून बोलवत आहे. तेव्हा जबाबदारी माझी. काय सांगायचं ते मी सांगेन. किंबहुना इथल्या अधिकाऱ्यांना एकदा कळूच द्या.’ मी म्हटलं, ‘तू एवढं म्हणतो आहेस तर मी देईन व्याख्यान; पण मला अशा स्पर्धेमध्ये उतरण्याची इच्छा नाही.’ ठरल्याप्रमाणे मी गेलो. माझ्या योगाप्रमाणे दुपारी बारा वाजता माझा विषय मांडण्याची पाळी माझ्यावर आली. मी सुरुवातीलाच सांगितलं, ‘वातावरण प्रतिकूल आहे. पण तरीही काही उदाहरणं घेऊन कविता कशी शिकवावी, हे मी तुम्हाला सांगतो.’ मी बारा ते साडेबारा बोललो. मी बोललेलं विद्यार्थ्यांना तर आवडलंच आणि ‘महाराष्ट्र राष्ट्रभाषे’च्या अधिकाऱ्यांचं आजच्या भाषेत ‘हृदयपरिवर्तन’ झालं. त्यांनी ‘रामाग्रज’ना सांगितलं की तुम्ही यापुढेही पराडकरानांच बोलवत जात. काव्य असं शिकवायचं असतं हे आम्हालाही माहीत नाही. मुद्दा विषयाचा आहे. विषय कुठल्याही संस्थेचा नसतो. त्यामुळे माझी हिंदीमधली लोकप्रियता त्यावेळी कायम राहिली. आजही ती कायम आहे. ही मी अर्थात्‌ सरस्वतीची कृपा समजतो. मुळात संस्कृतच्या अध्यापकाचा हिंदीशी जिवंत संबंध इतके वर्ष रहाणं, हे कठीण असतं. पण ते माझ्या बाबतीत योगायोगानं (!) घडलेलं आहे. हिंदी विद्यापीठाशी माझा संबंध १९५६ पासून आहे. त्यामुळे हिंदीतली माझी सहजता अजूनपर्यंत कायम आहे. मी याचं श्रेय मात्र हिंदीला न देता माझ्या संस्कृतच्या अभ्यासाला देतो. कारण संस्कृत हा माझा विषय असल्यामुळे शब्दांची अडचण मला हिंदीमध्येही भासत नाही. आजसुद्धा हिंदीचे मुंबईतले निवृत्त आणि आत्ता नोकरीत असणारे प्राध्यापक सुदैवानं असं म्हणतात की, ‘आप ऐसे व्यक्ति हैं जिनके भाषण का धाराप्रवाह उनके पहले शब्दसे शुरू होता है, यह हमारे भी देखने में बहुत कम आया है। लेकिन आपके बारे में उसे हमें मंजूर करना चाहिए।’ हे सगळं व्यवहारातलं हिन्दीचं सामर्थ्य आधारत: संस्कृतचं आहे.

ज्या सोमैय्या कॉलेजमध्ये मी प्रवेश केला होता. त्या कॉलेजमधेही माझी विद्यार्थ्यांमधली लोकप्रियता कायम होती. त्यामुळे मला त्यासाठी प्रयत्न करावा लागला नाही. पण करमसीशेठ सोमैय्या यांना संस्कृतबद्दल प्रेम होतं, संस्कृतच्या माणसाबद्दल अभिमानही होता ! पण त्यांचे स्वत:चे काही आग्रह होते. ते आग्रहवाईट जरी म्हणता आले नाहीत. तरी आधुनिक महाविद्यालयातल्या वातावरणात रुळणारे आणि जुळणारे नव्हते. त्यामुळे एक वर्षभरातच आमचे प्राचार्य याज्ञिक ज्यांनी मला

जवळजवळ बोलवूनच घेतलं. त्यांचंच त्यांच्याशी पटेनासं झालं. याचा कारण तसं म्हटलं तर फार मोठं होतं असं नव्हे. आमच्या कॉलेजमध्ये त्यावेळचे रेक्टर म्हणजे माझे एकेकाळचे अर्थशास्त्राचे शिक्षक गोवर्धन पारिख आले होते. त्यांनी सहज कॉलेजच्या आवारात सिगरेट ओढली. करमसीभाईंना हे पसंत नव्हतं. याज्ञिकांना असं वाटलं की याचा उगाच बाऊ करण्याचं कारण नाही. कारण ते युनिव्हर्सिटीचे रेक्टर होते. अशी अनेक कारणं होती. त्या कारणांमध्ये आपल्या कॉलेजच्या मुला-मुलींमध्ये प्रेमाचे संबंध निर्माण होता कामा नयेत, असा करमसीभाईंचा आग्रह असे. हा आग्रह तसं पाहिलं तर दुराग्रह. या सगळ्याचा मानसिक त्रास आमचे प्राचार्य याज्ञिक यांना झाला. पारिखांसंबंधातली घटना ही उंटावरची शेवटची काडी ठरली !

याज्ञिकांना माझ्याबद्दल विशेष आस्था होती. त्यांनीच एकदा मला सांगितलं होतं की तुमच्या वर्गावर एखादी गुजराथी विद्यार्थिनी उशीरा आली तर ती रडत असे. कारण नंतर तुम्ही तिला वर्गात प्रवेश देणार नाही. ती म्हणत असे की, 'आज आता माझी ४५ मिनिटं गेली. ती काही परत मिळणार नाहीत.' या सगळ्यामुळे त्यांना माझ्याबद्दल फार आपुलकी होती. त्यामुळे त्यांची सोमैय्यामध्ये कुचंबणा व्हायला लागल्यावर त्यांनी एक दिवस मला सांगितलं, 'पराडकर, पुढच्या वर्षी मी हे कॉलेज सोडतोय.' अर्थात् त्यांनी पार्ल्याच्या केळवणी मंडळाच्या मिठीबाई कॉलेजमध्ये त्यांची नेमणूक करून घेतली होती. ते एक उत्तम शिक्षक होते यामध्ये काही शंका नाही आणि गुजराती समाजामध्ये त्यांना फार प्रतिष्ठा होती. तर ते म्हणाले, 'पराडकर, तुम्हाला इथे काहीच अडचण नाही. माझ्यापाठोपाठ तुम्ही इथे आला हे जरी खरं असले तरी तुम्हाला तुमचे अस्तित्व आहेच. तेव्हा इथे तुम्हाला प्रतिस्पर्धी निर्माण होण्याचा प्रश्न नाही. प्रशासनाच्या दृष्टीने मला प्रश्न आले तरी तुम्हाला त्याचा काही उपसर्ग नाही.' तेव्हा मी त्यांना म्हटले, 'आज जरी नाही तरी पुढे याचा केव्हातरी त्रास होण्याचा संभव आहे.' तेव्हा ते म्हणाले, 'तुम्ही जर इथे असमाधानी असाल तर आमच्या मिठीबाई कॉलेजला तुम्ही हवेच आहात, असं मी सांगतो. पण त्याच्यासाठी तुम्हाला इथला राजीनामा माझ्या हातातच द्यावा लागेल कारण इथला राजीनामा दिल्याशिवाय मला तिथे काही करता येणार नाही.' व्यवहारत: हे बरोबर नव्हतं. पण माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. त्यामुळे मी त्यांना राजीनामा लिहून दिला. रीतसर मला नंतर मिठीबाई कॉलेजचं नियुक्तीचं पत्रही आलं. एक मात्र मान्य केलं पाहिजे की करमसीशेठनी माझ्याशी असलेले संबंध कायम ठेवले. कुठलाही समारंभ झाला की त्या समारंभाचं घरी निमंत्रण येत असे. कारण मी संस्कृतचे बऱ्यापैकी काम करतो अशी त्यांची श्रद्धा होती. आज ते नाहीत तथापि त्यांच्या माझ्यावरील श्रद्धेचा थोडासा परिणाम त्यांचे सुपुत्र शांतिलाल सोमैय्या यांचा माझ्याशी वागण्यातही होता. अर्थात् प्रत्येकाची पद्धती वेगळी असते. करमसीभाईंना जेवढी संस्कृतबद्दल अभिजात आस्था होती तेवढी आस्था शांतिलालना आहे, असे काही मी म्हणणार नाही. तरीपण माझ्या बाबतीत शांतीलालभाईनीही आस्था दाखवलेली आहे, माझ्या अभ्यासाबद्दल आणि वक्तृत्वाबद्दलही विश्वास आहे यात वाद नाही.

वर्षभरात मी आणखी एक कॉलेज सोडून दुसऱ्या कॉलेजमध्ये विभागाध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारला. तसं पाहता माझ्या एकूण अध्यापकीय आयुष्याचा विचार करता मला नेहमी असं वाटत आलंय की, A rolling stone gathers no mass. असं इंग्रजीत म्हणतात तसं माझं थोडंसं झालंय. मिठीबाई कॉलेज हे मला प्रवासाच्या दृष्टीनं सोयीचं होतं. तिथेही मी विभागाध्यक्ष असल्याने माझ्या हातात नियुक्तीचं नव्हे तर कुठले विषय मी शिकवायचे, कुठले विषय माझ्या सहकाऱ्यांनी शिकवायचे हे सगळे जे प्रशासनामध्ये असतं, ते सगळं मला व्यवस्थित करता आलं. तोपर्यंत संस्कृत जगतामध्ये १३ ते १४ वर्षे झाल्यामुळे मला थोडंसं स्थान होतं. मला

तेथे सहकारीही माझं महत्त्व ओळखणारे मिळाले. त्यामुळे मला त्यांना कधी काही सांगावं लागलं नाही. मीही जाणीवपूर्वक माझ्या सहकाऱ्यांना जे कठीण वाटण्याचा संभव आहे ते विषय माझ्याकडे घेत होतो. कारण प्रत्येक विषयामध्ये प्रत्येकाला थोडीफार सुलभता असते आणि एखाद्या विषयामध्ये नसते. पद्य शिकवण्यापेक्षा गद्य शिकवणं कठीण. कारण पद्यामध्ये थोडं भावनिक आवाहन करता येतं. गद्यामध्ये चिंतनाला जास्त महत्त्व असतं. आमच्या इंटर आर्टस् आणि बी.ए.मध्ये जे जे कठीण विषय होते, ते ते मी माझ्याकडे ठेवण्याचा प्रयत्न केला. मेहता म्हणून आमचा एक सहकारी होता. (तो आता अमेरिकेत स्थायिक झालाय. प्रोफेसर आहे.) इंटर आर्टस्‌ला 'अभिज्ञानशाकुंतलम्' नाटक होतं. त्याने सांगितलं की ... कारण तुम्ही रुईया कॉलेजमध्ये अनेक वर्षे नाटक शिकवलेलं आहे आणि अभिज्ञानशाकुंतल असताना तुम्ही ते शिकवू नये असं व्हायला नको !' मी त्यांना सांगितलं, 'मी जवळजवळ सगळी नाटकं जी परीक्षेला लावतात. ती रुईयाच्या बारा वर्षात शिकवली आहेत. म्हणून मी ते नाटक तुम्हाला देऊन मी गद्य वेचे घेणार आहे. त्या गद्य वेच्यांमध्ये तत्त्वज्ञान होतं, धर्मशास्त्र होतं, कौटिल्याचं अर्थशास्त्र होतं. या सगळ्या गोष्टींची भूमिका तयार असणं आवश्यक होतं. म्हणून मी जाणूनबुजून माझ्याकडे असे विषय घेतले की ज्यामध्ये विद्यार्थ्यांना खरोखर मार्गदर्शनाची अपेक्षा होती. मला असं वाटतं की विभागाध्यक्षाचं हे कामच आहे. विभागातल्या इतर लोकांना जे सोयीचं आहे. ते त्यांना आधी द्यायचं आणि त्यांच्या दृष्टीनं जे गैरसोयीचं ठरण्याचा संभव आहे ते सगळं त्यांनी माझ्याकडे द्यायचं असा मी एक अलिखित नियमच केला होता. मी वर्षारंभीच सांगत असे की तुम्ही तुमचे विषय निवडा. त्यातून उरलेले माझे. त्यामुळे मला माझ्या सहकाऱ्यांचा मोठा विश्वास मिळाला. ते असं बोलून दाखवीत की, 'असं म्हणणारे विभागाध्यक्ष नसतात.'

एक वयानं प्रौढ अशी विद्यार्थिनी हौस म्हणून संस्कृत शिकायला मिठीबाईमध्ये येत असे. तिने मला आपणहून सांगितलं की तुम्ही हे सिलेक्शन तुमच्याकडे जाणूनबुजून ठेवता हे आमच्या दृष्टीनं चांगलं लक्षण आहे. कारण हे शिकवणं सोपं नाही.

मिठीबाई कॉलेजमध्ये वातावरण मला अनुकूल होतं. पण माझा योग हा स्थित्यंतराचा असल्यामुळे ३-४ वर्षानंतर इंग्रजीचे विभागाध्यक्ष म्हणून निसीम इझीकेल आले. वेळापत्रक तयार करणं हा कुठल्याही महाविद्यालयामध्ये (शाळेतसुद्धा) अत्यंत अडचणीचा विषय असतो. त्या वेळापत्रकात संघर्ष न येणं हे फार कठीण काम असतं. त्याबाबतीत मी आणि बायॉलॉजीचे तेथील अध्यक्ष बस्ताना म्हणून होते, तर आम्ही ते वेळापत्रक तयार केलं. इझिकेलला इंग्रजीमध्ये आजही स्थान आहे. तसा त्यांचा अभ्यासही आहे. त्याबद्दल आमचा संघर्ष येण्याचं कारणच नव्हतं. पण आयुष्यात योगायोग असतात. इझिकेल (आज दुर्दैवाने ते हयात नाहीत) आणि त्यावेळचे युनिव्हर्सिटीचे रेक्टर पारिख आणि याज्ञिक यांचे फार जवळचे संबंध होते. विशेषत: याज्ञिक आणि पारिखांचे. चार वर्षांनी जेव्हा उपप्राचार्य नेमण्याचा प्रसंग आला. (कलाशाखेला) (त्याला काही पैसे मिळत नसत पण उपप्राचार्य हे एक पद आहे.) त्यावेळेस प्रत्यक्ष बस्ताना जे उपप्राचार्य झाले त्यांच्याही मनाविरुद्ध माझ्या अनुमानाप्रमाणे उपप्राचार्य नेमताना मात्र इझिकेलचा विचार केला गेला. अर्थात् मी विभागाध्यक्ष होतोच. तेव्हा कमी दर्जाचा प्रश्न नव्हता. पण ते पद मानाचं होतं. माझ्या बाबतीत ते झालं नाही. अर्थात् झालं नाही म्हणजे मी असं म्हणेन की याज्ञिकांनी ते केलं नाही. माझ्याबद्दल निरतिशय आस्था असतानासुद्धा! त्यांच्यावर काय दडपण आलं मला माहिती नाही. पण त्या दडपणाचा दृश्य परिणाम असा झाला. एका दृष्टीनं इतिहासाची पुनरावृत्तीच होत होती. रुईयामध्ये जे घडलं तेच मिठीबाईमध्ये होत होतं. तिथल्या सगळ्या लोकांनादेखील नवल वाटत होतं की असं का व्हावं? माझ्या दृष्टीने हे योग असतात. जे कुणाला

टाळता येत नाहीत. त्याला माझ्यासारखं उत्तर प्रत्येकानं द्यावं असं मी म्हणणार नाही. कारण ते सोपं नाही आणि व्यवहारात जुळणारंही नाही. योगायोगानं त्यावेळेला माझे पी.एच्.डी.चे गुरू हरिभाऊ म्हणजे श्री. ह. दा. वेलणकर यांची 'भांडारकर चेअर' म्हणून युनिव्हर्सिटीमध्ये नियुक्ती झाली. संस्कृत-प्राकृत विभागाचे युनिव्हर्सिटीतले अध्यक्ष. कॉलेजच्या दृष्टीने विचार केला, तर हरिभाऊ विल्सनचे. त्यांच्यानंतर ते जॉइंट डायरेक्टर झाले भारतीय विद्याभवनचे. त्यामुळे माझे-त्यांचे संबंध चांगले होते. ते म्हणाले, 'पराडकर, मला संस्कृत आणि प्राकृत दोन्ही सांभाळायला तुमच्यासारख्या माणसाची गरज आहे. अर्थात् इथं मुंबई विद्यापीठात तुम्हाला लेक्चरर म्हणूनच यावे लागेल. कारण प्राध्यापक एकच. आणि मी एक संस्कृत अर्धमागधीचा अभ्यास असलेला आणि दुसरा पालीचा अभ्यास असलेला, असे दोन लेक्चरर्स घेणार आहे. मी माझ्या विल्सनमधल्या विद्यार्थ्यांना सांगणार आहे कोण यायला तयार आहे मला माहीत नाही. पण तुम्ही जर यायला तयार असलात तर मला आनंद आहे.' 'ऋकसूक्तवैजयंती' म्हणून त्यांचं एक पुस्तक होतं. त्या पुस्तकामधील त्यांनी शंभर सूक्तं निवडली होती. त्या पुस्तकासाठी विद्यापीठाला प्रदेशातला एक दाताही मिळाला. त्याच्या जोरावर ऋकसूक्तवैजयंतीचा हिंदी अनुवाद करायला मी सुरुवात केली होती. त्यामुळे १९६४ सालीच तो अनुवाद प्रकाशितही झाला होता. ही मूळ ऋग्वेदातली शंभर सूक्तं. त्या शंभर सूक्तांचा अनुवाद करतानाही सुरुवातीला त्यांनी मी विल्सनचा नसल्यामुळे - विल्सनचे एक विद्यार्थी, जे शास्त्री होते आणि बनारसला राहिले होते, त्यांची मदत घेतली होती. मी अर्थात् अशा चौकशा कधी करत नाही. पण नंतर तेच म्हणाले, 'पराडकर, तुम्ही या हिंदीला रूप देऊ शकाल, त्यावेळी मी मिठीबाई कॉलेजमध्येच होतो. मी म्हटलं मी तुमच्यासाठी एवढं नक्कीच करीन ! तेव्हा ते सगळं माझ्याकडेच आलं.

याची थोडीफार मदत मला आता १९६६ मध्ये झाली असली पाहिजे. पण मी मिठीबाईमध्ये प्रोफेसर होतो आणि मला तिथे धोका वगैरे अजिबात नव्हता. पण मी असा विचार केला की जर मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत-प्राकृत विभागामध्ये काम करण्याची संधी मिळत असेल तर माझ्या संशोधनालाही उपयोग होईल आणि एकंदर संस्कृत विभागालाही आपोआपच थोडातरी उठाव येईल. (उठाव मूळचा वेलणकरांचाच मिळायला पाहिजे. पण तोपर्यंत माझंही थोडं नाव झालं होतंच.) त्यामुळे मी ते स्वीकारलं. गुरुवर्य वेलणकरांचं थोडंसं हे सांगितलं पाहिजे की त्यांच्या मनातून थोडा सख्खं-सावत्रपणा होता. म्हणजे विल्सनचे विद्यार्थी त्यांच्या दृष्टीने सख्खे. मी त्यांच्या हाताखाली पी.एच्.डी. केली असली तरी मी विल्सनचा नव्हे हे सत्य उतर होतंच ! असं म्हणण्याचं कारण ही स्पष्ट करतो. नंतर जेव्हा मी हे लेक्चररचं पद स्वीकारलं (मिठीबईपेक्षा थोडं जास्त वेतन मला अर्थात् मिळणार होतंच.) तेव्हा कळलं की आमच्या गुरुवर्यांनी विल्सनमधल्या त्यांच्या विद्यार्थ्याला (तो विल्सनचा संस्कृत विभागाध्यक्ष) विचारलं होतं या पदाबद्दल - आणि हे वेलणकरांनीच मला सांगितलं. पण विल्सनचा विद्यार्थी त्यांना म्हणाला, 'गुरुजी, मला व्यवहाराचाही विचार करायला पाहिजे आणि भविष्याचाही. त्यामुळे केवळ तुम्ही आहात म्हणून मी येणं हे मला काही बरोबर वाटत नाही.' या त्याच्या उद्गारांचं वेलणकरांना मात्र फार दु:ख झालं. कारण त्याला त्यांनी सुरुवातीपासून मुलासारखं सांभाळलं होतं. वस्तुत: यांनी मला हे काही सांगण्याची गरज नव्हती. मला या गृहस्थांची पहिल्यापासूनच एवढी माहिती होती की यानी ती सांगण्याची आवश्यकता नव्हती ! त्या दृष्टीने वेलणकर म्हणाले की, मी तुम्हाला मानतो कारण तुम्ही माझ्यासाठी आलात. एरवी तुमचं स्थान मिठीबाईमध्ये उत्तम होतं.

सांगायची गोष्ट म्हणजे १९६६ मध्ये मी मुंबई विद्यापीठात संस्कृत-प्राकृतचा साधा व्याख्याता म्हणून रुजू झालो. माझ्याबरोबरचे सहकारी म्हणून श्री. भट यांची निवड झाली होती. नियुक्ती झाल्यावर वेलणकर मला

म्हणाले, आता आपला नवा विभाग सुरू झाला आहे. त्याला लोकप्रियता मिळावी, म्हणून संस्कृत-साधारण (general) आणि संस्कृत विशेष (त्याकाळी मराठी, हिंदी आणि इंग्रजी या ज्यांच्या प्रधान भाषा असत ते मार्कस् मिळवण्यासाठी का होईना साधारण संस्कृत घेत असत. त्यामुळे 'संस्कृत जनरलला' गर्दी असे.) यापैकी 'संस्कृत-साधारण' हा अभ्यासक्रम विद्यापीठाने शिकवावा असा धोरण त्यांनी ठरवलं. आता 'संस्कृत साधारण' शिकवायचं म्हणजे त्यावेळी दोन प्रश्नपत्रं असत. एक महाकाव्याचा असे आणि एक असे बाणभट्टाच्या कादंबरीचे महाकाव्यांच्या बाबतीत सांगायचं म्हणजे त्यावेळेला 'शिशुपालवध' हे महाकाव्य पाठ्यक्रमात होतं. वेलणकर म्हणाले, तुम्हाला कुठलं शिकवायचं आहे? मी म्हटलं. असूया, सुप्तस्वरूपातली असूया. प्रथम म्हणूनच 'निबंध' शिकवायला सांगितला गेला होता. निबंधाला ५० मार्क असत. हा विषय लोक शिकवायला कुणी उत्सुक नसे. सर्व मिळून सुमारे २० विद्यार्थी होते. संस्कृतमध्ये विचार कसा करावा, संस्कृतमध्ये सुभाषितांचा वापर कसा करावा, संस्कृतमध्ये कर्मणि रचना अधिक चांगली असते. विषयाची प्रस्तावना कशी करावी हे मी शिकवू लागलो. माझं सुदैव असं की मी हिंदी माध्यमातून माझ्या प्रचारवर्गांमध्ये हे सगळे विषय शिकवत होतो. कारण तिकडेही साधारणपणे जो कठीण विषय असेल तो मला द्यायचा असं ठरलेलंच होतं. प्रचारकाला प्रचारवर्गामध्ये साहित्य म्हणजे काय, अलंकार म्हणजे काय हे शिकवणं कठीण जायचं. माझा तर तो विषयच. त्यामुळे सगळ्याचा उपयोग मला इथे झाला. विद्यार्थी उघड बोलनू दाखवू लागले की पराडकर सर निबंधांबद्दल जे सांगतात, ते आम्हाला आजवर कुणीच सांगितलं नाही ! त्यामुळे एम्. ए. च्या अध्यापनात मला स्थिरता आली. सांगायची गोष्ट म्हणजे 'वाचायचं आणि शिकवायचं' अशी सवयच असल्यामुळे मी एका आमच्या कॉलेजच्या मुलीकरता सांख्ययोग वाचला आणि शिकवला. विद्यार्थ्यांचं प्रेम मला मिळालं याचं कारण हे आहे की त्या विद्यार्थ्यांबद्दल मला खरंच आस्था होती. त्यामुळे 'नवीन विषय शिकवायचा' हा जरी त्रास असला (!) तरी तो माझ्या शिकवण्यावरील प्रेमामुळे मी घेतला.

भटांनी आपणहून सांगितलं की मी कादंबरी शिकवणार ! मी म्हटलं ठीक आहे. मी शिशुपालवध शिकवेन. संशोधनातच बराचसा वेळ गेल्यामुळे शिकवण्याची जी एक धाटणी असते ती भटांजवळ नव्हती. त्यामुळे एकीकडे मी ज्या वर्गाला 'शिशुपालवध' शिकवत असे. त्याच वर्गात त्यांची 'कादंबरी' ४५ मिनिटं चालूच रहात नसे. कारण विषय लवकर संपल्याची जाणीव त्यांना व्हायची. (त्यांनीच मला हे सांगितलं. मी म्हटलं, तुम्हाला शिकवण्याची सवय नाही म्हणून असं होतंय. पण घाबरू नका. हळूहळू जमेल. दुसरं असंही आहे की कादंबरीवर, बाणाबद्दल माहिती पुष्कळ उपलब्ध आहे. शिशुपालवध तसं इतकं सोपं नाही. महाकाव्य आहे. मला त्यात मुलांचा प्रतिसाद उत्तम आहे.) इथे मागे म्हटल्याप्रमाणे त्या मुलांची मराठी, हिंदी किंवा इंग्रजी ही भाषा प्रधान असे आणि त्यामुळे मी शिकवताना वाङ्मयातले जे इतर संदर्भ देत असे ते त्यांना पटत, आवडत. शिशुपालवधातला एक प्रसंग असा आला होता की नायक शिकारीला जात असतो. शिकारीला जाणाऱ्या माणसाने कसं सावध असावं, हे शिकवताना मी सहज असं म्हटलं की अहो तुम्ही जर शिकाऱ्यांची इंग्रजीमधली वर्णन वाचलीत, तर तुम्हाला यातलं मर्म समजेल. सावधपणा हा त्याच्या जीवनाचा भाग झाला पाहिजे. 'चौघड टायग्रेस' असा एक लेख आहे. हा शिकाऱ्याने लिहिलेला लेख आहे, ती वाघीणच त्याच्या मागावर असते. एकदा तिने बेसावध असं त्या शिकाऱ्याला पकडलंही ! हे सगळं मी सांगत असे. हे लोकांना अर्थातच आवडे. 'शिशुपालवध' सांगताना तुम्ही 'सर रिॲलिझम्' सांगता, शिकारवाङ्मय सांगता.. एकूण आम्हाला तुमचा तास संपू नये असं वाटतं. असं ते लोक मला सांगत.

या सगळ्या परिस्थितीमुळे इथे पुन्हा भटांना माझ्याबद्दल असूया निर्माण झाली. कारण त्यांच्या तासाला कुणी बसेनासं झालं. संघर्ष खरा तर काहीच नव्हता. एम्. ए. चे विद्यार्थी माझ्याकडे आले आणि विचारू लागले, 'सर, आम्ही त्यांच्या तासाला का बसावं?' मी आता याचं उत्तर काय देणार होतो? मी एवढंच म्हटलं, 'हा तुमचा प्रश्न आहे. मी असं म्हणणार नाही की तुम्ही बसू नका. ते शिस्तीत बसणार नाही.' ते म्हणायचे, 'अहो पण आता तुम्ही सहज म्हणून जे 'कादंबरी'बद्दल सांगताय ते त्यांना वर्षभरात वर्गात सांगता नाही आलं !' मी त्यांना म्हटलं, 'तुम्ही अप्रत्यक्षपणे माझी त्यांच्याशी तुलना करता आहात. हा त्यांच्यावर अन्याय आहे. कारण मी गेली २०-२५ वर्षे शिकवतो आहे. माझ्या-त्यांच्या शिकवण्यामध्ये फरक हा पडणारच. हळुहळू तुम्ही अभ्यस्त होत चला.' एम्. ए.ला शिकायलासुद्धा तेव्हा मोठमोठे लोक होते. ते म्हणले, 'आम्ही आता वेलणकर सरानाच सांगायला जाणार आहोत.' मी म्हणालो, 'तुम्ही मी सांगून थांबणार थोडेच आहात? पण न जाल तर बरं. थोडं थांबा. प्रौढांना काय सगळं शिकवावंच लागतं असं नाही. वाचूनसुद्धा कळू शकतं.'

या सगळ्याचा परिणाम माझ्याबद्दलची असूया वाढण्यात झाला. मी तत्वत: याबद्दल आमच्या गुरुवर्य वेलणकरांनाच दोष देतो. अप्रत्यक्षपणे माझ्याशी अध्यापनाचा अनुभव नसलेल्या व्यक्तीची तुलना झाली. मला अजून असं वाटतं की वेलणकरांचा आग्रह जो होता, 'साधारण संस्कृत' विभागामध्ये ठेवायचा, त्यामुळे हे झालं. कारण वेलणकरांना कामं पुष्कळ होती. त्यामुळे त्यांना शिकवणं शक्य नव्हतं.

पुढंपुढं दुर्दैवाने आमच्या भटांनी लोकांना सांगायला सुरुवात केली की .. लोकांनी मला येऊन हे सांगितलं. मी एवढंच म्हटलं, 'अहो, त्यांना 'अनपॉप्युलर' करण्यासाठी मला निराळं पॉप्युलर होण्याची गरज नाही ! ज्याला 'पॉप्युलॅरिटी' म्हणतात त्याची मी पर्वा कधीच केलेली नाही. उलट मी त्यांच्या विद्यार्थ्यांना समजावतो आहे की हा विषय तुम्ही अशा थराला नेऊ नका. मी आणखी काय करु ? म्हणजे आता मला एकच शक्य होतं. ते म्हणजे वाईट शिकवणं. ते मला शक्य नव्हतं ! वर्गात गेल्यानंतर माझ्या काही हातातहात नसे ! अनेक गोष्टी मला अशा सुचत असत की ज्या 'शिशुपालवधच्या' संदर्भात केवळ संस्कृत वाचणाऱ्या शिक्षकाला सुचतीलच असं नाही ! कारण मी इतर गोष्टीही वाचतो आणि या वाचनाचा परिणाम आपोआप होत असतो. त्यामुळे मी 'असूयेचा विषय' जाहलो ! अर्थात् मी याची पर्वा कधी केली नाही. 'कुछ तो लोग कहेंगे उनका कामही है कहना' असं म्हणून मी ते सगळं सोडून देत असे.

मला तिथे एम्. ए. ला अर्धमागधी शिकवण्याचीही संधी मिळाली. त्याचा फायदा मला असा झाला की अर्धमागधीशी संबंध असणाऱ्या गुजराती वाङ्मयाशी माझा संबंध आला. त्यामुळे थोडंसं गुजराथी वाङ्मयही डोळ्याखालून घालणं मला आवश्यक होऊन बसलं. एकदा असं झालं की गुजराथीचे एक सुप्रसिद्ध प्राध्यापक रामभाई बख्शी यांनी एक परिसंवाद ठरवला. त्यांनी मला विषय दिला 'ध्वनिवाद'. म्हणाले, तुम्ही हिंदीत बोला. कारण सर्व श्रोत्यांना विषय कळण्याच्या दृष्टीने ते सोयीचं होतं. ध्वनिवादावर इंग्रजीत बोलणं हे सर्वांना कळलं तर पाहिजे! त्यावेळी सुद्धा परिस्थिती फार निराळी होती असं नव्हे ! एका गुजराथीभाषी कॉलेजमधून काम केल्यामुळे माझ्या नावाचा आपोआपच दबदबा होता. मला काही त्याच्यासाठी कष्ट करावे लागले नाहीत.) ध्वनिवादावर बोलताना मी हिंदीत बोलत असल्यामुळे सर्व उदाहरणं संस्कृतमधली न घेता हिंदी वाङ्मयातली घेतली. मला भाषांतर करायला नको, ही माझी सोय मी बघितली खरंतर! तुलसीदास, सूरदास, बिहारी यांच्या वाङ्मयातली उदाहरणे घेऊन मी ध्वनिवादाचे सिद्धांत कसे आकर्षक होतात हे सांगितले. गुजराथी प्रोफेसर बख्शी ज्यांनी या परिसंवादाचे आयोजन केले होते ते म्हणाले, 'अरे, आपको तो सब

कंठस्थ है।' मी म्हटलं हा त्या त्या वेळचा प्रभाव आहे. ध्वनिवाद शिकवायचा म्हटल्यावर मी त्या वातावरणात शिकवलं झालं ! विद्यार्थ्यांच्या दृष्टीनं हे फार चांगलं होत होतं. पण आमच्या शिक्षकबंधूंना मात्र हे फार चांगलं वाटत नव्हतं. कारण त्यामुळे पराडकरांचा प्रभाव वाढत होता !!

कसे संघर्ष माझ्या आयुष्यात येत गेले पहा. युनिव्हर्सिटीमध्ये असताना एकदा जिथे आमची लेक्चर्स होत असत, तिथे एका विद्वान व्यक्तीचं भाषण रेक्टर पारिखांनी आयोजित केलं होतं. अशी व्याख्यानं जरी प्रतिष्ठेची असली तरी श्रोते कमी असतात. सगळीकडेच ही समस्या आहे. आमंत्रित वक्ते हे दुसऱ्या एका विद्यापीठाचे उपकुलपती होते. शंतनुराव किर्लोस्कर आले होते. संध्याकाळी ५.३० चं व्याख्यान. श्रोत्यांची उपस्थिती अत्यल्प. त्यात आमच्या प्रशासनामध्ये शिक्षकांना सांभाळून घ्यावं, असा संकेत नाही. त्यामुळे आम्हाला त्या समारंभाला बोलावलं नव्हतं. मला हे सगळं माहिती असल्यामुळे मी आमच्या गुरुवर्य वेलणकरांना आधीच सांगितलं होतं. 'तुम्हाला त्यांनी बोलावलंय. कारण तुम्ही विभागप्रमुख. पण आम्हा लेक्चरर्सना त्यांनी आमंत्रण दिलेलं नाही. तेव्हा माझा वर्ग भरलेला असतो. तो मी सोडणार नाही. तुम्ही मला तो सोडा, असं सांगू नका. कारण याची काळजी विद्यापीठाने घ्यायची होती. त्यांना माहिती आहे की ५.३० ते ७ या वेळात आमचे वर्ग असतात. माझ्या वर्गाला निरनिराळ्या लांबच्या ठिकाणाहून विद्यार्थी येतात आणि ते काहीतरी तयारी व्हावी म्हणून येत असतात. तेव्हा त्यांची पंचाईत करून मी वर्ग सोडणार नाही.' बिचारे वेलणकर ! ते म्हणाले, तुमचं म्हणणं तर्कसंगत आहे. त्यामुळे मी तुम्हाला वर्ग सोडा असे सांगू शकत नाही.' माझा वर्ग इकडे चालू आणि त्या समारंभाला श्रोते नाहीत, अशी परिस्थिती अपेक्षेप्रमाणेच निर्माण झाली. विद्यापीठा लाज जाण्याचा प्रसंग आला. How it is that Dr. Paradkar is engaging his class? असं त्यांनी वेलणकरांना विचारलं. वेलणकर म्हणाले, 'He always engages his class at this time. He has not left it because you have not invited him.' तेव्हा रजिस्ट्रार चिदंबरम् होते. ते म्हणाले, 'I will send a note in his class.' कारण त्यांच्यासमोर प्रश्न होता तो विद्यापीठाच्या प्रतिष्ठेचा. त्यांची नोट वर्गामधे आली : 'Dr. Paradkar, for the sake of University, I would like you to leave your class and ask them to attend the function. Please do it.' माझी कविता-जिच्यावर निरूपण चालू होतं, ती संपवली आणि मग विद्यार्थ्यांना सांगितलं की For the sake of maintaining the dignity of University I am leaving the class a bit earlier and I will request you to attend the function. त्यावेळेला माझ्या वर्गामध्ये जवळजवळ ५०० विद्यार्थी असत ! 'Sir we accept because you say' असं म्हणत माझे विद्यार्थी आले. समारंभ उत्तमपणे पार पडला. कार्यक्रम संपल्यावर इतकं मात्र सौजन्य रजिस्ट्रारनी दाखवलं की ते म्हणाले, 'Dr. Paradkar, I thank you for making the function a success. मी म्हटलं, 'It's all right. The matter is over now.' अशा गोष्टी त्या काळात बऱ्याच घडल्या. ही गोष्ट मी केवळ उदाहरणाबद्दल सांगितली. मला त्यावेळेलासुद्धा निरनिराळ्या कॉलेजेस्मधून संस्कृत विभागाच्या उद्घाटनाची किंवा अन्य बोलावणी येत असत. माझी असूया करणाऱ्यांच्या दुर्दैवाने नुसती संस्कृत विभागातूनच असत असं नाही तर हिंदी विभागातूनही असत. आमचे भट म्हणायला लागले की हा (म्हणजे मी) 'पुरूहुत' माणूस आहे. पुरुहुत म्हणजे पुष्कळ लोक ज्याला बोलावतात. हे ऋग्वेदामधलं इंद्राचं एक विशेषण आहे. तेव्हा म्हणाले, 'Paradkar is not a scholar, but is a person who is invited by many.' आमच्याकडे संस्कृतच्या एकंदरीत विद्यापीठीय जगतामध्ये शिक्षक चांगला असला म्हणजे तो स्कॉलर असतोच असं नाही, असा एक अलिखित मान्य संकेत आहे. मी चांगला शिक्षक होतो

म्हणजे साहजिकच विद्वान नाही, अशी धारणा रूढ व्हायला फार मदत झाली. याच्या मुळाशी अर्थात् असूयाच होती. पण हे पसरायला वेळ लागत नाही. अर्थात् 'मै अपने गत में' चालत होतो. पण सांगायलासुद्धा मला वाईट वाटतं की या पहिल्या २-३ वर्षांमध्ये आमच्या वेलणकरांनी एक अशी योजना मांडली होती की आता त्यांना एक रीडर घ्यायचाय. (लेक्चरच्या वरची श्रेणी असते रीडरची आणि रीडरच्या वरची प्रोफेसरची.) 'तुम्ही दोघेजण आहात. आता मी एक रीडरचं सँक्शन विद्यापीठाकडून घेतो.' वस्तुत: असं त्यांनी म्हणायला नको होतं. त्यांनी रीडरचं सँक्शन घेऊन मला असं जर म्हटलं असतं की मी तुम्हाला रीडर करतो तर ते जास्त योग्य दिसलं असतं. कारण त्यांच्यासाठीच मी आलो होतो. पण त्यांच्या डोळ्यांपुढे रीडर म्हणून एक निराळाच मनुष्य होता. त्याचं नाव मला माहित होतं. तोही माझा मित्रच होता. पण आता त्याला जर रीडर म्हणून नेमलं, तर माझी वरिष्ठता जाणार ना ! हे वेलणकराच्या लक्षात आलं नाही. त्यांना जाणुनबुजूनच करायचं होतं का? मला माहिती नाही. पण पारिखांच्या लक्षात आलं. तर त्यांनी सांगितलं, 'I will not recommend this. Why should you want a reader when already two lecturers are there?' त्यामुळे ते प्रकरण पुढे जाऊ शकलं नाही.

नंतर २-३ वर्षानंतर वेलणकरांची प्रकृती वयोमानानुसार बिघडत चालली. काम करणं त्यांना कठीण होत चाललं. साधारणपणे १९६९ मध्ये त्यांना काम करणं अशक्य झालं. पुढं ते गेले. लेक्चररला युनिव्हर्सिटीच्या नियमाप्रमाणे हेड ऑफ दि डिपार्टमेंट करता येत नाही. त्यामुळे मलाच पुढे Incharge of the Dept. असं त्यांनी म्हटलं. हे प्रशासन कौशल्य म्हणायचं! Incharge म्हटल्यावरसुद्धा काय काय अनुभव मी घेतले ! वेलणकर गेल्यावर मी एक सभा घेऊन त्यांच्याबद्दल मला काय बोलायचं होतं, ते बोललो. विद्यापीठाने त्यांच्या दुखवट्याची सभा भारतीय विद्याभवनमध्ये घेतली. (ते पूर्वी तेथे Joint Director होते) आमचे एस्. एन्. गजेंद्रगडकर हे कुलगुरु होते. तुम्हाला आश्चर्य वाटेल, या दुखवट्याच्या सभेचं मला आमंत्रण नव्हतं. खरंतर निमंत्रणच नव्हे तर युनिव्हर्सिटीतर्फे मला बोलायला सांगायला हवं होतं. मी आपल्या भाषामाध्यमांचा उपासक, पुरस्कर्ता, म्हणून माझ्याबद्दल गर्जेंद्रगडकरांना आस्था नाही. (गजेंद्रकगडकरांचा विषय एकेकाळी संस्कृतच होता. ते आचार्य घराण्यातले होते.) मी अर्थातच् निमंत्रण नसल्याने गेलो नाही. मला अनेकांनी विचारलं की अहो, तुम्ही कसे नाही? मी म्हटलं मी निमंत्रण असल्याशिवाय जात नसतो. व्याख्यान देण्याकरिता पुष्कळ व्यासपीठं मला उपलब्ध आहेत. मला विद्यापीठाने व्यासपीठ उपलब्ध करून द्यायला पाहिजे, अशी काही परिस्थिती नाही. असा चमत्कारिकपणा आमच्या परमप्रिय न्यायमूर्ती गजेन्द्रगडकरांनी का केला? यालाही कारण आहे.

मी व्याख्याता असताना 'University Teachers'च्या निवडणुका आल्या. मी अशा प्रकारात कधी नसतोच. पण माझे शाळेतले वर्गमित्र (दिवंगत प्रा. जोग हे मराठीचे नावाजलेले प्राध्यापक) मला सांगायला आले की यावेळेस आम्ही तुम्हाला प्रेसिडेंट म्हणून निवडायचं ठरवलंय. मी म्हटलं, तुम्ही ठरवलंय हे चांगलं आहे पण माझी एक अट आहे. ती अशी की दुसऱ्या कुणाचं नाव तुम्ही आधी ठरवलं असेल तर मला रुची नाही. त्यांनी मला असं सांगितलं. (ज्यांना स्वगीर्य ल.ग. जोगांनी) अरे, इथं कुणाचंच नाव नाहीय, तर तू का संमती देत नाहीस? मी म्हटलं देईन. पुढे उपाध्यक्ष म्हणून आमच्या विद्यापीठाच्या उषा मेहतांचं नाव आलं. पण आता कदाचित् मी निवडून येण्याची शक्यता निर्माण झाल्यामुळे जाणूनबुजून वीणा गजेंद्रगडकरांचं नाव अध्यक्ष म्हणून सुचवले असावे. या वीणा गजेन्द्रगडकर म्हणजे भाषाशास्त्र विभागाचे अध्यक्ष श्री. एस्. एन्. गजेन्द्रगडकर यांची सहधर्मचारिणी, या तत्वज्ञानाच्या प्राध्यापिका.

**- डॉ. मो.दि. पराडकर**

# माधुरी, M.F. Hussein आणि सरस्वती

*सरस्वती ही संकल्पना काय आहे यासंबंधी हा विचारांना चालना देणारा लेख.- संपादक*

## हुसेन यांची अभिव्यक्ती

१९९६ साली मकबुल फिदा हुसेन यांनी एक चित्र काढून समाजामध्ये खळबळ माजवून इतिहास घडविला. चित्र होते एका नग्न स्त्रीचे, तिच्या हातात कमळ, बाजूला मोर व फतकल मारलेल्या स्थितीतील मांड्यांवर वीणा. ह्या चित्राच्या खाली 'सरस्वती' असे शब्द. (पहा चित्र नं.१)





## बजरंग दल

जर बजरंग दलाने ह्या चित्रावर ज्वलंत व आक्रमक प्रतिक्रिया केली नसती तर कदाचित या ऋग्वेदीयन देवीच्या ह्या देशातल्या पवित्र स्मृतीला, झालेल्या ह्या 'विकृत सलामीबद्दल' काहीही प्रतिक्रिया न होता अभिमानशून्य झालेल्या या पिढीने आणखी एक प्रमाद न जाणता गिळून टाकला असता.

## सामाजिक प्रतिक्रिया

पण तसे व्हावयाचे नव्हते. ह्या आक्रमक प्रतिक्रियेवर ज्या उलटसुलट विचारांची आंदोलने झाली ती अभ्यास करण्याच्या आवश्यकतेची आहेत.

कारण, ह्या चित्राचा विषय हा 'सरस्वती' हा होता (चित्र नं. २)




Saraswati is the Hindu Goddess of all arts : Music, painting, sculpture, dance and writing. She is credited with presenting the gift of writing to mankind so that her songs could be written down and preserved. Saraswati is often depicted on the back of a swan or peacock, and with four arms, with which she plays the lute or drum and bestows jeweled blessings. She is the Goddess of eloquence, and words pour from her like a sweetly flowing river. One myth of this Goddess is that she is a jealous rival of the Goddess of wealth, Lakshmi and that pursuing wealth alone will assure that Saraswati's gifts will desert you.

या 'सरस्वती' - 'विषय' व संकल्पनेवर पुढच्या काळात अनेक उलाढाली होणार होत्या याची कल्पना त्यावेळी कुणालाही नव्हती.

### घटनांचा अर्थ

या लेखाचा विषय - त्यामुळेच, या घटनेचा कोणता अर्थ लावायचा - सरस्वती ही संकल्पना मुळात काय आहे - ती 'हिंदू देवता' आहे की 'गुप्त सरस्वती नदी' आहे की ऋग्वेदीय आध्यात्मिक संकल्पना आहे की हुसेन सारख्या जगप्रसिद्ध चित्रकाराच्या मनातील 'माधुरी दिक्षित' या सौंदर्यवती नटीची व हिंदू देवतांबद्दलची 'वैषयिक विकृती आहे' - हा आहे

### सामाजिक विचारांची पातळी

पण इतक्या गंभीर विचारधारेच्या अगोदर प्रचलित समाजाने या घटनेची कशी दखल घेतली हे जाणणे आवश्यक ठरेल. कारण, त्यात आजच्या युगात मानवी विचारांची कोणती पातळी आहे, बुद्धीची ज्ञानाची, संस्कृतीची, कलेची व एकंदर जीवनाची हे उमजेल.

### मेहेर पेस्तनजी

मेहेर पेस्तनजी आपल्या 'Art Attack is a Growing Disease' ह्या टाइम्स मधील लेखात लिहितात -

"The protesters have conveniently ignored the larger context of the work and chosen to focus on a single painting.

The other painting to meet their disapproval is a line-drawing of a semi-nude woman under which is written 'Saraswati'. The B.J.P. activists object to a deity's breasts being revealed. One wonders whether they are aware of the existence of Khajuraho and Konark, where they will certainly see much more than bare breasts. And, nobody doubts that thease are temples leave alone calling them works that insult religion."

### अनिल धारकर

अनिल धारकर बॉम्बे टाईम्स (११-१०-९६) मध्ये लिहितात -

"Much has been made about the fact that only Hindu Gods and Godesses are depicted in this way. That argument is silly because it overlooks traditions. Christianity has always, except for a stray case here and there, depicted Jesus Christ with a modest loin cloth. Islam, prohibits the pictorial depiction of Mohamed.

In fact, in the strictest sense, it proscribes the depiction of any human form. Whereas Hinduism, uniquely amongst religions, has glorified the human body and its physical senses. We worship the Yoni and the Lingam and Krisna disrobes the gopis.

That is the problem with religions fundamentalists. They always glorify their traditions, while knowing nothing about them, which is why they always remain a rabble waiting to be aroused.'

### इंडियन एक्स्प्रेस

इंडियन एक्स्प्रेसच्या ऑक्टोबर १०, १९९६ च्या संपादकीय अग्रलेखात खालील शेरे आहेत.

"Husain's unlearning' - A phoney war over divine nudity."

"A Disrobed Saraswati in an erotic posture has evoked such a Catharsis among aesthetes and a peculiar variety of politicos that issues like freedom of expression and the state's definition of art are being contested on the streets.

"For Husain, an ageing Sensationalists, who is rediscovering bodies as beautiful as Mother Teresa and Madhuri Dixit, Saraswati and Draupadi, freedom is as restless as his brush.

"The New Religion of Art, badly needs more

literate devotees with no sociological baggage."

**नवाकाळ**

नवाकाळ ह्या २८-५-९७ च्या अंकात 'कसाई वृत्तीचे हुसेन' यावर खालील भाष्य होते. 'हम आपके है कौन' हा चित्रपट उदंड चालला होता... माधुरीच्या घरंदाज सौंदर्यावर ख्यातकीर्त चित्रकार फिदा हुसेन, फिदा झाले असून, त्यांनी तो चित्रपट २४ वेळा पाहिला आणि माधुरीला आपल्या कुंचल्यातून साकारण्याचा त्यांनी निश्चय केला. लावण्याची खाण असलेल्या माधुरीची चित्रे रेखाटली गेली. पण पुढे हुसेन साहेबांची मूळची प्रवृत्ती उफाळून आली. ज्यात माधुरीला नैसर्गिक अवस्थेत चितारून तिच्या अंगावर उंट स्वार झाल्याचे चित्र या बहादूराने रेखाटले.'

**अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य**

ह्या विद्वानांच्या चर्चेमध्ये 'कलाकाराचे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य' हा विषय वारंवार येतो. त्याचा आपण नंतर विस्तृत समाचार घेऊच, पण, तत्पूर्वी प्रचलित पातळीवर कलाकारांच्या क्षेत्रातही ह्या 'अभिव्यक्ती' बद्दल काय निराळ्या प्रतिक्रिया आहेत त्या पाहूया.

**लक्ष्मण श्रेष्ठ**

लक्ष्मण श्रेष्ठ हे आपल्या 'Husain has studied Hindu religion deeply' (ह्या ता. १० ऑक्टोबर १९९६ ह्या 'एक्स्प्रेस न्यूजलाईन') ह्या लेखात म्हणतात :'

'Artists are enlightened people. They do respect the religous significance of mythology. But, they tend to look at mythology in the visual sense and their concern is the artistic way of expressing it. Husain is one artist, who has gone deep into Hindu religion as no artist has done."... "A little tension is necessary for creative artists. We are born that way."

**हिंदु धर्माचा अभ्यास**

हुसेन यांनी हिंदू धर्माचा खोलवर अभ्यास केला आहे की असा एकाही कलाकाराने केला नाही - असा निर्वाळा लक्ष्मण श्रेष्ठ हे देतात. शिवाय, ते पुराणातील संकल्पना दृष्ट संकल्पनांत आणतात आणि कलात्मक पद्धतीने चितारतात. हे त्यांचे सर्टिफिकेट किती खरे आहे हे आपण तपासूच.

**इंदर शर्मा**

पण इंदर शर्मा हे आणखी एक चित्रकार सुद्धा गॉडस् व गॉडसेस - देव व देवता याची चित्रे कित्येक दशके कॅलेंडरकरिता काढत असतात व त्यांची कन्या निमीषा दूसऱ्या टोकाला नग्न सौंदर्य चित्रकलेत साकार करत असते. त्यांची प्रतिक्रिया वाचूया.

I. Sharma - "Sharma feels that those artists, who are supporting Husain are doing it in their own interest.

They are the creators of the so called modern art. Under the garb of modern art a lot of nonsense passes off. These people do not visualise the picutres in their mind. They first paint something and later try to give it a name."

(इथे 'सरस्वती' हे नाव हुसेन यांनी नंतर लिहिलेले स्पष्ट दिसते.)

**निमीषा**

ह्या म्हणतात, 'When I saw Husain's piece, which he calls 'Saraswati' I was absolutely ashamed, because I saw no beauty there. Then there is also no question of Ethics. Does Husain have a right to act out all his fantasies?

Certainly an Artist has freedom of expression. But this freedom comes with a responsibility."

ही अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याबरोबर येणारी जबाबदारी कोणती हे आपण पुढे पाहुयाच !!

पण या सर्व प्रतिक्रियांच्या अत्यंत सामान्य व अपेक्षित जंजाळापुढे आमच्या ग्रंथालीचे एक मान्यवर टीकाकार दीपक घारे हे काय म्हणतात हे पाहणे जास्त उद्‌बोधक किंवा मूळ मुद्याकडे लक्ष वेधणारे ठरेल असे वाटते.

**दीपक घारे**

'हुसेन आणि कलावंताचा धर्म' (सरस्वतीच्या चित्रावरून फुका वादळ' ह्या आपल्या 'रूची' ह्या ग्रंथाली वाचक चळवळीच्या मासिकात (जानेवारी १९९७) काय लिहितात ते पहा.

'सरस्वतीचे नाते नदीच्या प्रवाहाशी जोडले गेले आहे. ऋग्वेदातल्या सप्तसिंधू स्तवनात सरस्वतीचे नाव आहे. वेदांमध्ये वाणीशी संबंधित अशी वाक्‌देवी म्हणूनही ती येते. पुराणामध्ये तिचा उल्लेख त्रिपुरसुंदरी म्हणून येतो. कमळ हे खरे तर आदिसागरातील निर्मितीचे प्रतिक, आर्येतर संस्कृतीतून आलेले. पण इथे ते सरस्वतीचे आसन आहे. श्वेतवस्त्र परिधान करणारी, हातात ग्रंथ आणि जपमाळ धारण करणारी असे तिचे रूप आहे.

राजा रविवर्मा यांच्या चित्रात दिसणारी आणि आज रूढ झालेली प्रतिमा, सरस्वतीच्या या रूपाशी मिळतीजुळती आहे.

तंत्रविद्येत मंत्रशक्ती म्हणून ती येते. ज्ञानशक्ती, इच्छाशक्ती आणि क्रियाशक्ती या रूपातही ती आढळते. वेदातील पूर्ण घट हा सरस्वतीचे प्रतीक आहे. मातीचा घट हा पाण्याने भरलेला असून तो गर्भाशयाचे प्रतीक आहे तर स्वस्तिक हे पुरुषबीजाचे, आंब्याची डहाळी आणि नारळ सृजनाची प्रतीके आहेत.

हे सर्व सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, देवदेवतांच्या प्रतिमा आणि प्रतिके यांचा गाभा तोच असला तरी बाह्यरूपे संदर्भानुसार, लोकसंस्कृतीनुसार बदलती असतात. त्यात अनेकदा अनेक प्रवाह येऊन मिसळलेले असतात. त्यातली खरी आणि पूजनीय प्रतिमा कोणती, हे त्या त्या पंथानुसार ठरते. पण कलावंताला स्वारस्य असते, प्रतिकांच्या सतत बदलत्या आणि नवनिर्माणक्षम रूपात. श्रद्धा ही मूर्ती अथवा प्रतिकाकडे अपरिवर्तनीय रूप म्हणून पाहते. तर चित्रकार अथवा कलावंत त्याच प्रतिकाकडे परिवर्तनशील अनेकांगी अविष्काराचे उगमस्थान म्हणून पहातो.'... हुसेनच्या विरोधकांनी सरस्वतीच्या प्रतिमेविषयी घेतलेले आक्षेप भारतीय कलेच्या परंपरेत बसणारे नाहीत. कारण, एक संस्था या अर्थाने हिंदुत्व हा धर्म आपण मानलेला नाही. हिंदु धर्मातील 'मिथके' ही संस्कृतीचा एक भाग आहेत, आणि त्याच्या विविध अन्वयार्थामध्येच त्यांचे सामर्थ्य दडलेले आहे.'

...'तेव्हा कोणत्याही धर्मपंथाचा आग्रह धरण्यापेक्षा कलावंताचा धर्म प्रमाण मानणे हेच श्रेयस्कर. त्याच्या सद्‌सद्‌विवेकबुद्धीला जे वाटेल तोच धर्म. कला व धर्म यांच्यात द्वंद्व निर्माण करणे कुणाच्याच हिताचे नाही.'

**वृंदा नाबर**

ता. ११-१०-१९९६ च्या टाइम्समध्ये Dionne Bunsha यांनी मुंबई युनिव्हर्सिटीच्या इंग्रजी विभागाच्या हेड ऑफ दि डिपार्टमेंट वृंदा नाबर यांची जी मुलाखत घेतली ती लक्षात घेण्याच्या योग्यतेची आहे.

Q - Can artistic expression be absolute?

If there are limitations, where do you draw the line?

A - No freedom can be absolute. There has to be a constant interaction betwen an individual's freedom to express, act, outrage and his role as a social being. The limits cannot be absolute. But, the artist has to be sensitive to the society, and have an artistic conscience. Conscience, unfortunately, is a sort of bad word in the artistic

community.

Q - Has there been a tradition of depicting Hindu gods and goddesses in the nude in Indian Culture ?

A - ... we have moved away in values, which those temples represent, it would be dishonest to use them to bolster an argument about Husain's painting, which is a product, whose existence is conditioned by today's norms of a market-driven economy. You can't just pick and choose an argument whenever, it suits you.

Secondly, Husain is painting for money. The painting's bottom line is commercial value, which is not true of Khajuraho or Ajanta. I feel that to compare them is a short-sighted and blinkered defence."

**भेळपुरी**

'सरस्वती' ह्या संकल्पनेवर चर्चा होण्याऐवजी इथे असे दिसेल की, चित्रकलेच्या क्षेत्रात अभिव्यक्ती, धार्मिक वाद, राजकारणातील सत्तासंघर्षामधील धर्माचा लिव्हरेज (तरफेची दांडी), नग्नतेतील वैषयिक शृंगारिक चेतावणी, ऐतिहासिक लेणी व त्यातील शिल्पे-नग्न शिल्पे, योनी पुजा, लिंगपूजा ह्याबद्दल असणाऱ्या अज्ञानी सेक्यूलरवाद्यांच्या स्वत:च्याच वैषयिकतेच्या भिंगऱ्या, चित्रकलेची व्यापारी 'अभिनव दृष्टी' वगैरे अनेक भेळपुरीची मैफल उडालेली दिसेल.

**अज्ञानी विद्वान**

आपल्याला या लेखांत या सर्व बारकाव्यांचा परामर्श वेळेअभावी घ्यावयाचा नाही. कारण ह्या सर्व अज्ञानी विद्वानांना 'सरस्वती' ह्या संकल्पनेचा उगम व त्या संकल्पनेचा मूर्त स्वरूपातील प्रतिकांत झालेले संक्रमण ह्याचा पत्ताच नाही - जरी त्यांनी विद्वत्तेचा आव आणला तरी खेदाने असे म्हणावे लागेल की त्यांना मूळ संकल्पनेबद्दल उत्सुकता नाही - एक तऱ्हेची अनास्थाच आहे. हे कसे व का हे पुढे पाहूया.

**सरस्वती प्रार्थना**

ह्या सर्वसाधारण अज्ञानी अहंकाराची व पवनचक्कीशी वाऱ्यावर तलवारीनी लढाई करणाऱ्या सँको पांझा याची उपमाच योग्य ठरेल.

याचा आणखी नमुना म्हणजे डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी केलेल्या 'सरस्वती प्रार्थनाच्या सूचनेवर सेक्युलर व इस्लामी फंडामेंटलिस्टांनी केलेला गदारोळ.

**सरस्वती प्रोजेक्ट**

पण, हे अज्ञान इथेच थांबले नाही तर आदरणीय मोरोपंत पिंगळे व इतर कांही यांच्या आग्रहावरून 'डॉ. एस्. कल्याणरामन यांनी केलेल्या अवाढव्य 'SARSVATI RIVER PROJECT' बद्दलही अंशत: लागू पडेल. कसे ते आता पाहूया.

या इथे आता 'सरस्वती' ह्या मूळ संकल्पनेचे रूपांतर 'सरस्वती नदी व तिच्या काठची सरस्वती, आर्य किंवा हराप्पन संस्कृती ह्याबद्दलचा एक अत्यंत मोठा 'आर्किलिऑलॉजिकल रिसर्च प्रोजेक्ट' होय.

या प्रोजेक्टचा संभार बाबासाहेब आपटे स्मारक समिती भारतीय इतिहास संकलन समिती, बंगलोर यांनी सांभाळला आहे.

**'डी-भगवेकरण'**

अर्जुनसिंग ह्या CMP ह्या नवीन केंद्रिय कॉंग्रेसी मंत्र्याने शिक्षणक्षेत्रातील 'डीसॅफ्रनायझेशनच्या' त्याच्या प्रयत्नात जे आक्षेप डॉ. जोशींवर केले. त्याचा परिहार करताना डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी उद्गार काढले की, "... the government was influenced by the marxist perception on education, which was unjust as it completely ignored India's Vedic past, especially after the existence of the mythical Saraswati

and the presence of a civilisation along its banks had been established" (Times 18/6/2004)

### वेदिक संकल्पना व वास्तव नदी

'सरस्वती' ह्या भारतीय हिंदू, वेदिक मूळ संकल्पनेशी हा वाद आता नक्कीच जास्त जवळ आला. त्याचे श्रेय डॉ. जोशी व डॉ. कल्याणरामन समूहाला द्यावयलाच पाहिजे.

मग त्यांना पुरते श्रेयाचे धनी का होता आले नाही? हे समजून घेण्यासाठी येथे थोडासा श्वास घेणे व जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. कारण, ह्याची मीमांसा 'स्पिरीच्यूअल सायन्स' ह्या प्रांतातील आहे व त्या शास्त्राचा अर्वाचीन अधिकार महायोगी अरविंद घोष पाँडिचारी यांना द्यावा लागतो.

डॉ. कल्याणरामन यांनी त्यांच्या 'सरस्वती' प्रोजेक्टच्या पहिल्या पुस्तकात ज्या शास्त्रांचा (मल्टी डिसीप्लिनस्) आधार घेतला त्यांचा उल्लेख आहे.

"I have drawn on the research of many scholars, who have studied the Civilisation from many disciplines and many perspectives : archaelogical, artistic, linguistic, ethographic, geological, hydrological and historical..." (p. XVII)

### स्पिरीच्यूस सायन्स वाद का?

ह्या पुस्तकात ऋग्वेदाचाही आधार दर्शविलेला आहे. तरीही त्यांना 'सरस्वती' ह्या सत्यदर्शनाची जाणीव झालेली नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.

कारण? कारण असे की ऋग्वेदातील मूळ संस्कृत ऋचांचे 'अर्थ' लावण्यासाठी त्यांनी सायनाचार्य व विल्सन ह्या 'विभूतींचांच' आधार ग्राह्य मानला आहे.

त्यामुळे फार मोठी गफलत झाली आहे.

### महायोगी अरविंद

त्यांनी जर श्री. अरविंद यांचे ह्या संबंधातले 'The Secret of the Veda' हे पुस्तक नुसते चाळले असते तर त्यांना एक मोठा प्रमाद टाळता आला असता

विश्वरचनेमध्ये पुरुषसुक्तांत वर्णन केल्याप्रमाणे व्यक्त जगाच्या तिप्पट अव्यक्त जग आहे. विश्वरचनेमध्ये जेव्हा शक्तीचा प्रथम उगम झाला तेव्हा त्या स्वसंवेद्य शक्तीच्या अनेकविध आविष्कारामध्ये हे जड जग निर्माण झाले. त्यात आपली पृथ्वी व त्यावरील 'विशेष प्राणी मानव' हा निर्माण झाला. ह्या अनंत कोटी ब्रह्मांडाचे ज्ञान होण्यासाठी साधन सामुग्री त्याच्या देहात, बुद्धीत, मनात व अंत:करणात काही व्यक्त स्वरुपात व काही निद्रित अवस्थेमध्ये ठेवण्यात आली आहे. ह्या कूटस्थ निद्रित सामुग्रीला जागृत व समर्थ करण्यासाठी कांही साधना (योगिक) ह्या आवश्यक आहेत त्या साधनेला मदत करणाऱ्या तीन मुख्य वैश्विक शक्तींची नावे इला, मही, सरस्वती अशी आहेत.

### वैश्विक शक्ती

इथे, पुन्हा एकदा श्वास घेऊन सरस्वती नदी, सरस्वतीच्या काठची 'सारस्वत संस्कृती' याच्या पाठीमागे जाऊन 'सरस्वती' ह्या संकल्पनेच्या स्पिरीच्यूअल प्रांतातील मूळ कल्पनेकडे जाण्याचे प्रयोजन काय असा प्रश्न उपस्थित होईलच. त्याचा विचार बघितला पाहिजे.

### ऋग्वेद

जर ऋग्वेद हे मानवी साहित्य व शब्दसंस्कृतीचे अत्यंत जुने व मूळ क्षेत्र मानले तर त्यात 'सरस्वती' या शब्दाचा प्रथम उल्लेख झाला हे मान्य व्हावे व त्यानंतर इतर गोष्टींना म्हणजे नदी, मूर्ती, चित्र व संस्कृती यामध्ये या 'सरस्वती' मूळ कल्पनेचा विस्तार किंवा नामकरण वा काव्यात्म छटांचा रंगांचा लाभ झाला हे उघड आहे.

### सत्यज्ञान

मग, स्पिरीच्यूअल सायन्समार्फत ह्या विश्वातील चिरंतन अश्या तत्वांचा जर सत्य परिचय व ज्ञान व्हावयाचे

असेल तर ते सामान्य मानवाला दुरापास्त आहे. ही जाणीव मुख्य आहे. त्या जाणिवेकरिता इला (दृष्टी - Truth Vision), मही (Truth Cousciousness), सरस्वती (Truth Audition - श्रुती) ह्या वैश्विक शक्तींची मदतीची आवश्यकता आहे.

**वेदांचे खरे अर्थ व बोध**

ह्या ठिकाणी महायोगी अरविंद काय म्हणतात हे त्यांच्याच शब्दात जाणणे महत्त्वाचे ठरेल.

'इला, सरस्वती, मही तिरत्रो देवीर मयोभुवः ।
बर्हि सीदन्त्व अस्थिधः ॥ (१.०१३.०९०)

याचे शब्दशः भाषांतर 'सरस्वती' ह्या कल्याणरामन ह्यांच्या शोधपुस्तकात असे दिले आहे.

'May the three undecaying goddesses, givers of delight, sit upon the sacred grass.'

उघडच आहे की या अर्थाने काहीच बोध न होता हे वेद हे एखाद्या तर्र झालेल्या कवींची बेलगाम विसंगत बोधहीन, अर्थहीन कवने आहेत असे वाटेल. ह्याचा दोष केवळ व्याकरणावर आधारलेले भाष्य करणारे सायनाचार्य व परकीय संस्कृतीत शिकलेले व वाढलेले विल्सन साहेब यांच्याकडे जाईल. दुर्दैव हे आहे की अजूनही पाश्चात्त्य विद्येतील पारंगत विद्वानांकडे अशी कामे सुपूर्त केली जात आहेत.

मग खरी गोष्ट ही आहे की हे खरे अर्थ प्राप्त होण्यासाठी योगिक ज्ञानाची, अध्यात्मज्ञानाची व शक्ती जागृत झालेल्या शुद्ध व सत्वशील मनाच्या साधकाची आवश्यकता आहे.

**The Secret of the Vedas**

मग त्याकरिता जी प्रचंड धडपड, अभ्यास श्री अरविंदांनी केला त्यांचे संपूर्ण भाष्य 'The Secret of the Veda' ह्या ग्रंथातून वाचावयाला व अभ्यासावयाला हवे.

अरविंद यांच्या सत्य अर्थ प्राप्त करण्याची गुरुकिल्ली कोणती व त्याचे 'सरस्वती' ह्या विषयावरचे संशोधन कोणते ते आता पाहूया.

'... The veda has a double aspect.. The Rishis arranged the substance of their thought in a system of parallelism by which the same deities were at once internal and external Powers of Universal Nature, and they managed its expression through a System of double values, by which the same language served for their worship in both aspects."

The Veda is primarily intended to serve for spiritual enlightenment and Self-Culture."

**True Knowledge**

ज्या सामान्य मानवाला जडसृष्टीच्या मर्त्यपणाचे भ्रम निरासणारे ज्ञान इंद्रियामार्फत होऊ शकत नाही व सत्य व ऋत (वेदिक) सत्य तत्वांचे दर्शन वा बोध घडत नाही त्याला त्या 'Truth Consciousness' च्या प्राप्तीची आवश्यकता आहे.

**वेदातील सरस्वती**

Saraswati (Cosmic Energy) is an awakener of the consciousness to right thinkings or right states of mind.

पुढे अरविंद म्हणतात तेही महत्त्वाचे आहे. Saraswati, the inspiration, is full of her luminous plenitudes, rich in Substance of thought. She upholds the sacrifice, (यज्ञ - हे पुढे पाहू) the offering of the mortal beings activities to the divine by awakening his Consciousness so that it assumes right states of emotion and right movements of thought in accordance with the truth from which she pours her illuminations and by impelling in it the rise of those truths, which according to the vedic Rishis, liberate the life and being from falsehood, weakness and limitations and open to it the doors of the Supreme felicity.

सामान्य माणसाचे जे ज्ञान आहे त्याला ते 'false Mortal Vision of things' असे म्हणतात. भौतिकवादी विद्वान व शास्त्रज्ञांचे ज्ञानसुद्धा त्याच दर्शनात मोडते.

**ऋग्वेद व अर्थ**

''पावका नः सरस्वती वाजेभिर्‌ वाजिनीवती ।
यज्ञं वष्टु धियावसुः ॥ (ऋ १-००३.१०)

ह्याचे सायनाचार्य वा विल्सन यांचे भाषांतर देत नाही. ते अर्थहीन व चुकीचे आहे. जिज्ञासूंनी ते डॉ. कल्याणरामन यांच्या 'सरस्वती' ग्रंथातून वाचून खात्री करावी) पण, पं.श्रीराम शर्मा आचार्य ह्या ('गायत्री संप्रदायाच्या' आध्यात्मिक 'अधिकारी') योग्याचे भाषांतर देतो आहे.

'हे पवित्र करमेवाली सरस्वती ! तू बुद्धिद्वारा अन्न-धन को देनेवाली है । हमारे इस यज्ञ को सफल कर ॥१०॥

सत्य कर्मो की प्रेरक उत्तम बुद्धि को प्रशस्त करनेवाली यह सरस्वती हमारे यज्ञ को धारण करनेवाली है ॥ ११ ॥'

'महो-अर्णः सरस्वती प्रचैतयति केतुनां ।

धियो विश्वा विराजति ॥ (ऋ १.००३.१२)

'सरस्वती विशाल ज्ञान समुद्र' को प्रकट करनेवाली है । वही सब बुद्धियों को ज्ञान की ओर प्रेरित करती है ॥१२॥

**शक्ती की नदी ?**

मग सरस्वती ही एक पंजाबमधील नदी आहे ही कल्पना ह्या 'सरस्वती'च्या आध्यात्मिक सामर्थ्यावरून कशी काय ठाम किंवा स्थिर व मान्य होऊ शकते? हा प्रश्न आहे.

इथे अरविंद स्पष्टपणे म्हणतात,

But this line may, so far as the mere grammatical form of it goes, be quite otherwise translated; we may take महो अर्णः in apposition to Saraswati and render the verse "Saraswati, the great river, awakens us to knowledge by the perception and shines in all out thoughts." If we understand, the physical river in Punjab, we get an incoherence of thought and expression, which is impossible except in a nightmare or a lunatic asylum."

"But it is possible to suppose that it.. means the great flood of inspiration and that there is no reference to the great ocean of the Truth-Consciousness."


**यज्ञ**

आता ही ह्या विश्वातील प्रत्येक गोष्टीबद्दल 'सत्यज्ञान' मिळण्याची जी प्रक्रिया आहे - ती सरस्वती, इला, मही वगैरे देवता (वैश्विक शक्तींची नावे व वैशिष्ट्ये) यांच्यामुळे प्राप्त होते यात शंकाच नाही, पण तरीही त्या त्या प्रत्येक व्यक्तीला त्यासाठी एक 'सोमयज्ञ' य सोमप्राशन करावे लागते. (चित्र नं. ३ व ४)

हा 'सोमयज्ञ' म्हणजे कुंडलिनी शक्ती - मुलाधारातून ऊर्ध्वगती करून सहस्त्रार चक्रात पोचवून नंतर काँशसनेसमध्ये एक तऱ्हेचा 'ज्ञानयज्ञ' व त्याच्या योगाने होणाऱ्या 'सोमज्ञानाचा' - खऱ्या ज्ञानाचा, श्रृतीज्ञानाचा स्त्रोत, पुन्हा सर्व अस्तित्वात व शरीरात पसरवण्याचा उद्योग म्हणजे 'यज्ञ' होय. ह्याच यज्ञाचा संदर्भ ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात आला आहे व त्याचा मतीतार्थ भगवद्‌गीतेतील वाचून प्राप्त झालेल्या 'पृष्ठभागी वरवरच्या' शाब्दिक ज्ञानाचा खऱ्या बोधात व आचरणात आणण्याचा आहे.

"Thus yajna or sacrifice, which apparently was a ritual of constructing an altar, kindling there a fire and offering oblations to 'Agni' and other 'Nature Powers' with the chanting of Vedic Mantras was in its secret psychological sense a spiritual Sadhana...'


"The whole process of the Universe", says




Sri Aurobindo, "is in its very nature a sacrifice (यज्ञ), voluntary or involuntary, Self-fulfilment by self-immolation, to grow by giving is the Universal Law." - V. Jaybee.

**मनोगत**

आता या लांबलेल्या लेखाचा आढावा घेतला तर त्याचे सूत्र लक्षात येईल. 'सरस्वती' ही संकल्पना आमच्या ऋषीमुनींना एका आत्मसाक्षात्कारी श्रृतीज्ञानाने उपलब्ध झाली. ती एक अव्यक्त, गूढ अशी वैश्विक शक्ति अस्तित्वात आहे. तिच्या स्फूर्तीने व साधकाच्या यज्ञक्रियेने त्याला, म्हणजे या मर्त्य देहातील कॉंशसनेसला, या जड व मर्त्य जगातील पृथ्वीवरील अस्तित्वात जे दृश्य वा अदृश्य ज्ञान प्राप्त होते, ते चिरंतन सत्याचे नसून एक भ्रमात्मक स्वरुपाचे आहे. पण, स्पिरीच्यूअल साधनेने खरे ज्ञान प्राप्त होण्यासाठी जी उपलब्धी आहे तिच्या विशिष्ट स्वरूपाचे नाव 'सरस्वती' आहे. त्या सरस्वतीची व त्या कॉस्मिक स्रोताची उपमा या आर्यावर्तात आलेल्या व नदीच्या काठी रहाणाऱ्या मानवी





(पान क्र. ३२ वर)

# हंपी

*भारतातील प्रसिद्ध अशा कलाकृतींचा परिचय सदर लेखमालेतून करून देत आहोत. - संपादक*

(लेख क्र. ४)

हंपी येथील सर्वात मोठे व प्रख्यात मंदिर म्हणजे विठ्ठल स्वामी मंदिर. राजा कृष्णदेव याने त्याच्या बांधकामास इ.स. १५१३ मध्ये सुरुवात केली. याचे प्रांगण ५०० फूट लांब व ३०० फूट रुंद आहे. गर्भगृह मंडप आणि अर्धमंडप असे मंदिराचे तीन भाग आहेत. त्याची लांबी ६९ मी. असून उंची ७.५ मी. आहे. या इमारतीचा वेधक भाग म्हणजे तेथील स्तंभयुक्त मंडप. एकसंध बारा फुटी स्तंभ अर्धमंडपाला तोलून धरतात. मंदिराच्या तुळ्या म्हणजे प्रचंड असे अखंड पाषाणच आहेत. सगळे खांब अलंकृत आणि कोरून सुंदर बनवले आहेत. याच मंदिराच्या आवारात कल्याण मंडपाजवळ एक पाषाणाचा रथ आहे. तो सर्वांगसुंदर आणि सुबद्ध असून त्याची उंची २६ फूट आहे. रथाची चाके थोड्याशा प्रयत्नाने कुणालाही फिरवता येतात. हंपीच्या शिल्पकलेच्या मस्तकी तो जणू राजमुकुट शोभतो.




विठ्ठल मंदिर हंपी, विजयनगर

इथला आणखी एक महाप्रचंड देव म्हणजे नरसिंह होय. तो आसनमांडी घालून बसला आहे. तरी त्याची उंची ३० फूट सहज भरेल. शिवाय त्याच्या मस्तकी नागफणीचे छत्र व त्याही वर कीर्ती मुख म्हणजे ती उंची आणखीनच वाढते. इथे त्याच्या मांडीवर हिरण्यकश्यपू नाही पण तरीही त्याचा जबडा उघडा आहे आणि डोळे बाहेर आलेले आहेत.

विजयनगर येथे हजाराराम नावाचे आणखी एक प्रसिद्ध मंदिर आहे. त्याच्या शेजारीच सीतामंदिरही आहे. राम मंदिरावर रामचरित्रातील हजार प्रसंग त्यात कोरले आहेत म्हणून याचे नाव हजाराराम मंदिर पडले असावे. याची पूर्व पश्चिमोत्तर लांबी २०० फूट व दक्षिणोत्तर लांबी ११० फूट आहे. येथे बहुकोनाकृती स्तंभ असून ते दगडी भिंतींनी वेष्टित आहेत. भिंतीवर हत्ती, घोडे, उंट यांची उत्थित शिल्पे आहेत.

हंपीमधेही विरुपाक्ष मंदिर आहे व ते महत्त्वाचे आहे. आपल्या गुरुचे स्मारक म्हणून हरिहराने हे मंदिर बांधले. कृष्णदेवराय सिंहासनावर बसल्यानंतर त्याने या मंदिरासमोर १६५ फूट उंचीचे व ११ मजल्यांचे गोपुर बनवले. विरुपाक्ष मंदिराला दोन प्रांगणे आहेत. पूर्व गोपुरातून आत गेल्यावर ती लागतात. पहिल्या प्रांगणापेक्षा दुसरे अधिक विस्तृत



विठ्ठलमंदिराच्या आवारातील पाषाणरथ

आहे आणि त्यातच विरुपाक्षाचे मंदिर आहे. त्याच्या परिसरात अनेक छोटी मोठी मंदिरे आहेत. मुख्य मंदिरावर सोन्याचा कळस आहे. विरुपाक्ष हे शिवलिंग आहे.

संकलन - **सौ. मंजिरी दांडेकर**
कलाशिक्षिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.ठाणे)

**संदर्भ**


- A History of Fine Arts in India & the west - Edith & Tomary
- संस्कृतीकोश
- विश्वकोश
- भारतीय कलेचा इतिहास


दिशा
नियमित
वाचा

(पान क्र. ३२ वरून)

## माधुरी, M.F. Hussein आणि सरस्वती

समूहानी त्या हिमालयाहून आलेल्या नदीला दिली. त्याच सरस्वतीची मूर्ती व चित्रे आमच्या कलाकारांनी काढली. त्यांचा हेतू या संकल्पनेच्या मूळ स्वरूपाकडे लक्ष वेढण्याचा व साधनेला उद्युक्त करून मर्त्य मानवी जीवाच्या सनातन प्रश्नाला सत्यदर्शन मिळवून देण्याचा होता.

**संस्कृती सामर्थ्याचा विसर**

पण, आजचे कलाकार, समाजशास्त्रज्ञ, भौतिकवादी शास्त्रज्ञ, राजकारणी ह्यांना आपल्याच संस्कृतीतील ज्ञानाचा, साधनेचा, उद्दिष्टांचा पत्ता नसावा ही खरोखर अत्यंत खेदाची गोष्ट आहे. त्यांची सर्व शक्ती अत्यंत उथळ वादांमध्ये व प्रयत्नांमध्ये खर्च होत आहे व स्वत:च्या वृत्तीतील प्राणीस्तरावरील दोषांचे प्रदर्शन करण्यात येत आहे. हे सर्व उशीरा कां होईना, पण जाणवावे, हा या लेखाचा हेतू आहे. त्यात नकळत कुणाचा उपमर्द झाला असेल तर सरस्वतीला स्मरूनच क्षमा मागतो. हरी ओम !

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन,
ठाणे (प.) - ४०० ६०१.
टेलि. नं. : २५३६ ८४५०
ई-मेल : yrsane@bol.net.in
(Spiritual Science Center, Thane)

# परिसर वार्ता

## विद्या प्रसारक मंडळाचे ७०व्या वर्षात पदार्पण.

विविध क्षेत्रातील मान्यवरांना घडविणाऱ्या ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाने १ ऑगस्ट २००४ रोजी ७०व्या वर्षात पदार्पण केले. संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त महाविद्यालयाच्या आवारात विविध वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

मंडळातर्फे निर्माण करण्यात आलेल्या सरस्वती या सर्वसामान्यांना परवडणाऱ्या संगणक वितरणाची सवलत योजना यावेळी जाहीर करण्यात आली.

वर्धापन दिनाच्या औपचारिक कार्यक्रमप्रसंगी संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. वि. तथा अण्णासाहेब करंदीकर, तसेच कोषाध्यक्ष मा. य. गोखले, डॉ. विजय बेडेकर, ख्यातनाम वास्तूरचनाकार वसंत पानसरे, जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य सदाशिव गोखले, बांदोडकर महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या माधुरी पेजावर, तंत्रनिकेतनाचे डी. के. नायक आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष आणि शिक्षणतपस्वी कैलासवासी वा. ना. बेडेकर यांचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर रहावा म्हणून श्री. साठे हे त्यांच्या पुतळ्याची उभारणी महाविद्यालयाच्या दर्शनी भागात करणार आहेत. श्री. पानसरे हे त्या परिसराचे सुशोभीकरण करणार आहेत.

आजी-माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संघटनांना ध्वजार्पण करून वेगळी ओळख प्रदान करण्यात आली. मंडळाच्या 'दिशा' जा मासिकाचे वितरण झाले. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मंडळाने मैलाचा दगड पार केला असून सरस्वती या सर्वसामान्यांना परवडेल अशा संगणकाची निर्मिती केली आहे. सर्व कर समाविष्ट करून या संगणकाची किंमत केवळ १७ हजार ५०० रूपये होते. संस्थेच्या विद्यार्थ्यांना हा संगणक १७ हजार रूपयातच उपलब्ध होणार आहे.



विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापनदिनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना अध्यक्ष श्री. करंदीकर




ख्यातनाम वास्तूरचनाकार वसंत पानसरे यांचा सत्कार करताना विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. अण्णासाहेब करंदीकर सोबत डॉ. विजय बेडेकर आणि कोषाध्यक्ष मा.य.गोखले

प्राचार्य गोखले, नायक आणि सौ.पेजावर यांनी आपल्या शाखांचे अहवाल याप्रसंगी सादर केले. ई-बुक प्रात्याक्षिकांमध्ये चिपळूणकरांची निबंधमाला सादर करण्यात आली.

## डॉ. अतुल बेडेकर - पीएच्.डी. चे मार्गदर्शक


डॉ. अतुल बेडेकर

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. अतुल बेडेकर यांना मुंबई विद्यापीठाची पीएच.डी. चे मार्गदर्शक म्हणून मान्यता मिळाली आहे.

'बायोपॉलिमर चिटीन' हा त्यांचा विशेष संशोधनाचा विषय असून युरोपिअन चिटीन सोसायटीच्या निमंत्रणानुसार त्यांनी मलेशिया व फ्रांस येथे झालेल्या चिटीन विषयक परिषदांना ते उपस्थित होते. गतवर्षी फ्रान्स, कॅनडात झालेल्या एक परिषदेत संशोधन निबंध सादर केला होता. एँटिडाएबिटीक हर्बल प्रॉडक्टचे प्रमाणीकरण या क्षेत्रातही त्यांचे विशेष संशोधन असून त्याचा भारतातील अनेक मधुमेही रुग्णांना उपयोग होऊ शकणार आहे.

बांदोडकर महाविद्यालयाच्या रसायन शास्त्र विभागात संशोधन कार्य सुरू करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

## श्री. प्रकाश माळी



बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील कनिष्ठ महाविद्यालयाचे रसायनशास्त्र शास्त्रातील प्रा. प्रकाश माळी यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून शिक्षणशास्त्र निष्णात (एम्. एड्.) ही पदवी प्रदान केली. प्रा. माळी सरांना या परीक्षेत प्रथम वर्ग मिळाला आहे.

अलीकडेच माळी सरांनी मुंबई क्रिकेट पंच संघटनेच्या ठाणे विभागातील व प्रकाश वझे स्पोर्टस फाऊंडेशनने संयुक्तरित्या आयोजित केलेला त्रैमासिक प्रशिक्षण वर्ग ही यशस्वीरित्या पूर्ण केला. त्याबद्दल या संघटनांनी प्रमाणपत्र देऊन त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

प्रा. माळी सरांचे विशेष अभिनंदन !

## गीतेश शिंदे यास 'आदर्श कवी' पुरस्कार



अखिल भारतीय लोकसेवा समिती, मुंबईतर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या गीतेश शिंदे यांस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या सोहळ्यात कविवर्य प्रा. अशोक बागवे यांच्या हस्ते गीतेश शिंदे यांस 'आदर्श कवी' पुरस्काराचे सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास समारंभाध्यक्ष म्हणून अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे सरचिटणीस श्री. दीपक म्हात्रे तसेच मुंबई महानगरपालिका उपायुक्त श्री. शांताराम शिंदे आणि मान्यवर उपस्थित होते. यावेळी गीतेशने सादर केलेल्या कवितेचे सर्वांनी विशेष कौतुक केले. गीतेशला साहित्यप्रातांत यापूर्वीही कविवर्य मंगेश पाडगांवकर, नारायण सुर्वे, शंकर वैद्य आदी मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांतून पारितोषिके मिळाली आहेत.

चित्रवाहिन्या आणि प्रसार माध्यमांच्या जबरदस्त आक्रमणामुळे वाचन संस्कृती लयास जात आहे, त्यामुळे युवापिढीचे विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे आणि पर्यायाने ग्रंथ चळवळ, ग्रंथ व्यापार आणि ग्रंथ विश्वाची अतोनात हानी होत आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालय आणि ग्रंथांविषयीची उत्सुकता, आवड व आपुलकी निर्माण व्हावी आणि त्यातून वाचन संस्कृतीची जोपासना व्हावी या हेतूने ठाण्याच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे दोन दिवस चालणाऱ्या दुर्मिळ



प्रदर्शन पाहतांना प्राचार्य स. वा. गोखले, प्रा. नारायण बारसे, प्रा. दामोदर मोरे व प्रा. अनिल भाबड

संदर्भ ग्रंथाचे (Reference Books) प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील शेकडो संदर्भ ग्रंथ या प्रदर्शनात विद्यार्थी व नागरिकांना प्रत्यक्ष पाहण्याची व चाळण्याची संधी मिळाली.

या प्रदर्शनात अनेक जगप्रसिद्ध विश्वकोश, शब्दकोश, ज्ञानकोश, संस्कृती कोश, परिभाषा कोश, पर्याय शब्दकोश,(समांतर कोश), वार्षिके (year book), चरित्र-आत्मचरित्र, चरित्रात्मक संदर्भ ग्रंथ, प्रवासी मार्गदर्शक, खंडात्मक रामायण आणि महाभारत, तत्त्वज्ञान कोश, सामाजिकशास्त्र कोश, गिनीज बुक ऑफ रेकॉर्डस, लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस, विविध जागतिक नकाशे, दिनदर्शिका (Almanacs) इत्यादी वैविध्यपूर्ण संदर्भ साहित्य रसिक वाचकांसाठी प्रदर्शित केले गेले.

नॅशनल जॉग्रफीच्या सर्व सीडी रॉम्स, आणि इतर महत्त्वपूर्ण दृक-श्राव्य संदर्भ साहित्य या निमित्ताने या ग्रंथ प्रदर्शनात उपलब्ध केले गेले.

या ग्रंथ प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणजे १२ ऑगस्ट आणि १३ ऑगस्ट असे दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथ प्रदर्शनात या सर्व उपलब्ध संदर्भ ग्रंथाचे व संदर्भ साहित्याचे मुखपृष्ठ आणि या संदर्भग्रंथातील माहिती व त्यातील साहित्यविषयक थोडक्यात माहीती व गोषवा-याचे एका मोठ्या पडद्यावर चित्र स्वरुपात प्रत्यक्ष सादरीकरण (Power Point onlive Presentation) सातत्याने करण्यात आले. ठाणे महाविद्यालयातील ग्रंथालयांचे संपूर्ण संगणकीकरण आणि अत्याधुनिकीकरण झालेले आहे (OPAC) याचीही प्रचीती या निमित्ताने ग्रंथप्रेमींना आली.

ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य स. वा. गोखले यांच्या हस्ते गुरुवार दि. १२ ऑगस्ट २००४ रोजी सकाळी ९.३० वाजता जोशी-बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचन कक्षात झाले.

प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी प्रा. बारसे व त्यांच्या ग्रंथालयातील सर्व सहकाऱ्यांनी विशेष कष्ट घेतले.

### तंत्रनिकेतनात एक दिवसीय परिषद

तंत्रनिकेतनातर्फे ८ ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या १ दिवसाच्या राष्ट्रीय परिषदेस शंभरहून अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. ठाणे महानगरपालिकेचे विशेष सहकार्य लाभलेल्या या परिषदेत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. के. डी. लाला यांनी ठाणे शहरात होणाऱ्या पाणी पुरवठ्याची तपशीलवार माहिती दिली. सौ. मनीषा प्रधान यांनी सादर केलेला शोध निबंधात ठाण्यातील तलावांच्या संवर्धन संबंधी विचार मांडलेले होते.

'जलस्त्रोतांचे प्रदूषण' या विषयावरील ही परिषद अेआयसीटीइ ने प्रायोजित केलेली होती. समारोपाच्या सत्रांत महापालिका आयुक्त श्री. संजय सेठी यांनी तंत्रनिकेतनाच्या सदर परिषद आयोजनाचे कौतुक केले व कचरा व्यवस्थापनासाठी आस्थापनेस सहाय्य ठरू शकतील अशा संशोधन प्रसारांसाठी महापालिका मदत करेल असे सांगितले.

### डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

इनरव्हील क्लब आयोजित पल्स पोलिओ पोस्टर स्पर्धेचा निकाल नुकताच प्राप्त झाला. त्या स्पर्धेत कु. अक्षता दळवी, ऋजुता पत्की, अनिकेत मांगले या

विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त. ही स्पर्धा फेब्रु. २००४ मध्ये घेण्यात आली होती.

दै. सामना 'उत्सव' आयोजित कॅम्लिन प्रायोजित चित्रकला स्पर्धेत सात्विक पेणकर यास प्रथम पारितोषिक व अखिल माने यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त.

एप्रिल २००४ मधे ब्राह्मण सेवा संघ या संस्थेने घेतलेल्या संस्कृत स्कॉलरशिप परीक्षेत आपल्या शाळेतील ९ विद्यार्थिनींनी उल्लेखनिय यश संपादन केले आहे. संस्थेने १८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहीर केली. आपल्या शाळेतील शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थिनी पुढीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १) | कोलते स्मिता रमेश | ९९/१०० |
| २) | गोडबोले अनुश्री प्रकाश | ९९/१०० |
| ३) | ओगले अनुराधा गिरीश | ९८/१०० |
| ४) | आपटे शलाका गिरीश | ९५/१०० |
| ५) | पेंडसे रेणुका मिलिंद | ९३/१०० |
| ६) | गद्रे मिनल श्रीपाद | ९०/१०० |
| ७) | महाजन प्रेरणा भास्कर | ८९/१०० |
| ८) | कुलकर्णी प्रियांकाप्रकाश | ८९/१०० |
| ९) | दांगट चैताली रमेश | ८९/१०० |

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा २००४ चा निकाल पुढील प्रमाणे. ही परीक्षा ८वी, ९वी च्या विद्यार्थ्यांसाठी असते. इ. ८वी चा निकाल पुढील प्रमाणे -


१) तासकर भूषण उदय (राज्यात २४वा) १४०/२००
२) कोलते स्मिता रमेश (राज्यात २६वी) १३८/२००
३) मुणगेकर गार्गी सतीश (जिल्ह्यात ५वी) १३१/२००
४) गोडबोले अनुश्री प्रकाश (जिल्ह्यात ६वी)१३०/२००
६) पाटील अपर्णा केशव (उत्तेजनार्थ) १२४/२००
६) गाडगीळ ऋचा मुकुंद (उत्तेजनार्थ) १२५/२००
इ. ९वी सायली संजीव श्रोत्री (जिल्ह्यात २९वी) १७४/२००

**- संकलित**

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद दीर्घकाळ भूषविणारे डॉ. वा. ना. बेडेकर यांचे १४ एप्रिल २००४ रोजी आकस्मिक निधन झाले. त्यानंतर अलीकडेच जुलैच्या २५ तारखेस झालेल्या मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत २००४-०५ सालासाठी पुढील कार्यकारिणी निवडण्यात आली.

| | |
|---|---|
| श्री. श्री. वि. करंदीकर | अध्यक्ष (नवीन निवड) |
| डॉ. विजय बेडेकर | कार्याध्यक्ष - विश्वस्त |
| श्री. मा.य. गोखले | कोषाध्यक्ष |
| श्री. अु. भा. जोशी | कार्यवाह |
| श्री. ज. ना. कयाळ | सह कार्यवाह (नवीन नेमणूक) |
| श्री. मा. ना. पाटील | सभासद |
| श्री. दि. गु. जोशी | सभासद |
| श्री. र. ग. पटवर्धन | सभासद |
| डॉ. अ. ना. बापट | सभासद |
| डॉ. महेश बेडेकर | सभासद-(नवीन सभासद) |
| सौ. अल्पना बापट | सभासद (नवीन सभासद) |
| श्री. अनिरुध्द् जोशी | सभासद(नवीन सभासद) |

**श्री. श्री. वि. तथा अण्णासाहेब करंदीकर**



अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारलेले श्री. वि. करंदीकर विद्या प्रसारक मंडळाशी गेली चार दशके संबंधित असून कार्यकारिणीत त्यांनी विविध पदांवर कार्य केले आहे. 'मीच माझा घडलो' हे त्यांचे आत्मचरित्र ९८ साली प्रसिद्ध साहित्यिक रवींद्र पिंगे यांच्या हस्ते प्रकाशित झाले. ते करंदीकर कुलवृन्तांसाठी सध्या कार्यरत आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व लहान मोठ्या कार्यक्रमांना त्यांचे बहुमोल मागदर्शन लाभत आले आहे.

# ।।सरस्वती।।

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना नौपाडा, ठाणे १९३५

## Vidya Prasarak Mandal, Thane

**proudly announce the *Saraswati* PC**
**for students, teachers and educational institutions**
**at most affordable price.**

**(Inclusive of all taxes & No hidden cost)**

# Rs. 17,500/-
**ONLY**

### Celeron Machine Config.

CPU Intel cel 1.7 ● HDD 40GB FDD 1.44 ● 128 DDRAM ● 52 X CDROM ● 56.6 Kbps modem ● 107 Keys KBD Scroll Mouse ● Speakers ● Onboard 5.1 Ch sound ● Monitor 15" ● CASING TOWER ● Linux Os



***Contact :***
**Server Room**, Ground Floor,
Law College Bldg.,
'Jnanadweepa', Thane College Campus,
Chendani, Thane (West) - 400 601.
**Ph. : 2533 2413 / 3092 6989**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.